सोलापूर
तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | सोमवार, ३० डिसेंबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक २७६ | पाने : ८ | किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# राज्यघटना आपल्यासाठी मार्गदर्शक प्रकाश-दीपस्तंभ : पंतप्रधान

नवी दिल्ली, २९ डिसेंबर : येत्या २६ जानेवारी रोजी आपली राज्यघटना लागू होऊन ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. आपल्या सर्वांसाठी ही खूप अभिमानाची आणि गौरवास्पद बाब आहे. आपल्या राज्यघटनाकारांनी आपल्या हाती सुपूर्द केलेली राज्यघटना, काळाच्या प्रत्येक निकषावर सिद्ध झाली आहे. राज्यघटना आपल्यासाठी मार्गदर्शक प्रकाश-दीपस्तंभ आहे, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे. 'मन की बात' (११७ वा भाग) कार्यक्रमातून त्यांनी देशवासियांशी संवाद साधला.

ते पुढे म्हणाले, भारताच्या राज्यघटनेमुळेच आज मी इथे आहे, तुमच्याशी बोलू शकत आहे. यावर्षी २६ नोव्हेंबरला संविधान दिनापासून वर्षभर चालणाऱ्या अनेक उपक्रमांना सुरुवात झाली आहे. देशातील नागरिकांना राज्यघटनेच्या वारशाशी जोडण्यासाठी लेपींळींळेप७५.लो नावाचे खास संकेतस्थळही तयार करण्यात आले आहे. यामध्ये तुम्ही राज्यघटनेची प्रास्ताविका वाचून तुमची ध्वनीचित्रफीतही टाकू शकता. तुम्ही राज्यघटना वेगवेगळ्या भाषांमध्ये वाचू शकता राज्यघटनेबद्दल प्रश्नही विचारू शकता. 'मन की बात'चे श्रोते, शाळेत शिकणारी मुले, महाविद्यालयात जाणारे तरुण-तरुणी यांना मी विनंती करतो की त्यांनी या संकेतस्थळाला नक्कीच भेट द्यावी आणि त्याचा एक भाग व्हावे.

पुढील महिन्याच्या १३ तारखेपासून प्रयागराजमध्ये महाकुंभ मेळाही सुरू होणार आहे. संगमाच्या काठावर सध्या जोरदार तयारी सुरू आहे. मला आठवतं, काही दिवसांपूर्वी मी प्रयागराजला गेलो होतो, तेव्हा हेलिकॉप्टरमधून कुंभमेळ्याचा संपूर्ण परिसर बघून खूप आनंद झाला होता. इतका महाकाय! इतका सुंदर! एवढा भव्यपणा! महाकुंभ मेळ्याचे वैशिष्ट्य केवळ त्याच्या विशालतेतच नाही. कुंभाचे वैशिष्ट्य त्यातील वैविध्यात देखील आहे. या कार्यक्रमात कोट्यवधी लोक एकावेळी एकत्र येतात. लाखो संत, हजारो परंपरा, शेकडो पंथ, अनेक आखाडे प्रत्येकजण या कार्यक्रमाचा एक भाग बनतो. कुठेही भेदभाव दिसून येत नाही, कोणी मोठा नाही, कोणी लहान नाही. विविधतेतील एकतेचे असे दृश्य जगात कुठेही दिसणार नाही. म्हणूनच आपला कुंभमेळा हा एकतेचा महाकुंभही आहे. यावेळच्या महाकुंभातूनही एकतेच्या महाकुंभाचा मंत्र दृढ



होणार आहे. मी तुम्हा सर्वांना सांगेन की, जेव्हा आपण कुंभमेळ्याला जाल, तेव्हा एकतेचा हा संकल्प घेऊन परत या. आपण, समाजातील फूट आणि द्वेषाची भावना नष्ट करण्याची शपथही घेतली पाहिजे.

यावेळी देशभरातील आणि जगभरातील भाविक प्रयागराजमध्ये डिजिटल महाकुंभाचे साक्षीदार होणार आहेत. डिजिटल मार्गदर्शनाच्या मदतीने तुम्हाला विविध घाट, मंदिरे, साधूंचे आखाडे यांच्यापर्यंत पोहोचण्याचा रस्ता सापडेल. ही मार्गदर्शक प्रणाली तुम्हाला वाहनतळा पर्यंत पोहोचण्यासही मदत करेल. कुंभमेळ्याच्या कार्यक्रमात प्रथमच एआय चॅटबॉट चा वापर केला जाणार आहे. -ख चॅटबॉटच्या माध्यमातून कुंभमेळ्याशी संबंधित प्रत्येक प्रकारची माहिती ११ भारतीय भाषांमध्ये मिळू शकते. मजकूर टाइप करून किंवा बोलून कोणीही या चॅटबॉटवरून कोणत्याही प्रकारची मदत मागू शकतो. कुंभमेळ्याचा संपूर्ण परिसर कृत्रिम बुद्धिमत्ता संचालित कॅमेऱ्यांनी टिपला जात आहे. कुंभकाळात कुणी आपल्या व्यक्तीपासून हरवले ताटातूट झाली तर त्यांना शोधण्यातही हे कॅमेरे मदत करतील. भाविकांना, डिजीटल लॉस्ट अँड फाउंड सेंटर, या हरवले आणि सापडले केंद्राची सुविधाही मिळणार आहे. तसेच भाविकांना, सरकारमान्य टूर पॅकेज, निवास आणि होमस्टे म्हणजे स्थानिकांच्या घरात पर्यटकांची राहण्याची सुविधा याबाबतची माहिती मोबाईलवर दिली जाईल. तुम्हीही महाकुंभमेळ्याला गेलात तर या सुविधांचा लाभ घ्या आणि हो, एज्ञींरघरचरहरर्घीलह या हॅशटॅगसह तुमचा सेल्फी नक्कीच टाका.

'मन की बात' अर्थात चघइ मध्ये आता आपण घढइ बद्दल बोलणार आहोत. ज्येष्ठांच्या पिढीतील अनेकांना घढइ बद्दल माहीत नसेल. पण जरा मुलांना विचारा, त्यांच्यात घढइ खूप प्रसिद्ध आहे. घढइ म्हणजे क्रृश, तृश आणि बाल्टीबॉय. तुम्हाला कदाचित मुलांच्या आवडत्या निमेशन मालिकेबद्दल माहिती असेल आणि तिचे नाव आहे 'घढइ - भारत हैं हम' .आणि आता या मालिकेचा दुसरा हंगामही आला आहे. ही तीन निमेशन पात्रे आपल्याला भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील त्या नायक आणि नायिकांबद्दल सांगतात ज्यांची फारशी चर्चा होत नाही. नुकताच या मालिकेचा हंगाम-२, गोवा इथे नुकत्याच झालेल्या भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव-इफ्फीत अतिशय खास पद्धतीने सुरू करण्यात आला. सर्वात महत्वाची गोष्ट अशी की ही मालिका फक्त अनेक भारतीय भाषांमध्येच नाही तर परदेशी भाषांमध्येही प्रसारित केली जाते. ही मालिका दूरदर्शन तसेच इतर जढढ मंचांवर पाहता येईल.

आपल्या निमेशनपटांची, नियमित चित्रपटांची आणि टीव्ही मालिकांची लोकप्रियता हेच दाखवते की भारताच्या सर्जनशील उद्योगात केवढी क्षमता आहे. हा उद्योग देशाच्या प्रगतीत मोठे योगदान तर देत आहेच, पण आपल्या अर्थव्यवस्थेलाही नवी उंची गाठून देत आहे. आपल्या देशाचा चित्रपट आणि मनोरंजन उद्योग खूप मोठा आहे. देशातील कितीतरी भाषांमध्ये चित्रपट बनवले जातात आणि सर्जनशील आशयाची निर्मिती होते. मी आपल्या चित्रपट आणि मनोरंजन उद्योगाचेही अभिनंदन करतो कारण त्यांनी 'एक भारत - श्रेष्ठ भारत' ही भावना मजबूत केली आहे.

## रेल्वेत नोकरीच्या आमिषाने निवृत्त लष्करी जवानाची फसवणूक

पुणे : रेल्वेत तिकीट तपासणीस पदावर नोकरी लावण्याच्या आमिषाने एका निवृत्त लष्करी जवानाची १७ लाख २७ हजार रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला. याप्रकरणी एका महिलेसह साथीदाराविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी संजीवनी पाटणे (२७, रा. केदारी पेट्रोल पंपाजवळ, वानवडी), शुभम मोड (रा. येवलेवाडी) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत एका निवृत्त जवानाने फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी संजीवनी पाटणे हिने निवृत्त जवानाला रेल्वेत तिकिट तपासणीस असल्याची बतावणी केली होती. फिर्यादी यांची भाची आणि पुतणीला रेल्वेत नोकरी लावते, असे सांगून त्यांच्याकडून पैसे घेतले.

## मुंबई-गोवा महामार्गावर दुचाकीस्वाराचा मृत्यू

माणगाव : मुंबई-गोवा महामार्गावर वावेदिवाळी गावच्या हद्दीत शनिवारी दुपारच्या सुमारास भरधाव कारने दिलेल्या धडकेत दुचाकीचालकाचा जागीच मृत्यू झाला. याप्रकरणी माणगाव पोलिसांत नोंद झाली असून, कारचालकाला ताब्यात घेतले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, राजाराम अनंता धारदेवकर (वय ६५) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. कार महाडच्या दिशेने चालली होती, तर धारदेवकर हे कोलाडवरून माणगावच्या दिशेने चालले होते.

## चीनच्या सीमेलगत 'भगवा' फडकला! लडाखमध्ये उभारला छत्रपती शिवरायांचा पुतळा

लडाख : भारतीयांसाठी अभिमानाची बातमी समोर आली आहे. महाराष्ट्राचे आराध्य दैवत आणि हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारुढ पुतळा आता चीनच्या सीमेलगत उभारण्यात आला आहे. भारतीय लष्कराकडून या पुतळ्याचे अनावरण करण्यात आले आहे. त्यामुळे आता हिमालयाच्या पर्वतरागांतही मराठा साम्राजाचा भगवा फडकणार आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, महाराजाचां हा पुतळा पराक्रम, दूरदृष्टी आणि न्यायाचे प्रतिक आहे. देशभरात त्यांना मानणार तसेच त्यांचा आदर्श



घेणारा मोठा वर्ग आहे. यादरम्यान भारतीय लष्कराने पूर्व लडाखमध्ये भारत चीन सीमेवर छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा उभारण्यात आला असून नुकतेच या पुतळ्याचे अनावरण करण्यात आले आहे.

दरम्यान, छत्रपती शिवरायांचा सर्वात उंचावरील पुतळा लडाखमधील पँगाँग सरोवराजवळ उभारण्यात आला आहे. २६ डिसेंबर रोजी लडाखमधील पँगाँग तलावाच्या काठावर १४,३०० फूट उंचीवर असलेल्या या पुतळ्याचे अनावरण भारतीय लष्कराकडून करण्यात आले.

## मराठा समाज वधू-वर परिचय मेळाव्याला मोठा प्रतिसाद

### राज्यभरातून ८७६ मुला-मुलींची उपस्थिती; सामूहिक विवाह सोहळा घेणार : सपकाळ

छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी

महाराष्ट्र मराठा समाज सोयरिक ग्रुपच्या वतीने छत्रपती संभाजीनगरमध्ये नि:शुल्क वधू-वर परिचय मेळाव्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या मेळाव्यात तब्बल ८७६ मुला-मुलींनी सहभाग घेऊन आपला भावी वर आणि वधू निश्चितीला संमती दर्शविली. मेळाव्यातील मोठा प्रतिसाद पाहून लवकरच सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन केले जाईल, असे ग्रुपचे राज्य समन्वयक पोपटराव सपकाळ व भाउसाहेब काळे यांनी सांगितले.

सोयरिक ग्रुपच्या वतीने हर्सूल परिसरातील मधुरा लॉन्समध्ये मराठा समाजातील वधू-वरांचा मोफत परिचय मेळावा रविवार, २९ रोजी आयोजिण्यात आला होता. ३१ मेळावे यशस्वी केल्यानंतर रविवारी राज्यस्तरीय ३२ वा नि:शुल्क मेळावा घेण्यात आला. या मेळाव्यात मुलींपेक्षा मुलांची संख्या अधिक होती. यात वरांची संख्या ४८८ आणि सहभागी वधूंची संख्या ३८८ होती. मेळाव्यास प्रमुख पाहुणे म्हणून जालन्याचे खासदार डॉ. कल्याण काळे, समाज कल्याण मंत्री संजय सिरसाठ यांची उपस्थिती होती.

यापसंगी माजी शिक्षणाधिकारी टी. पी. पाटील, व्यापारी महासंघाचे अध्यक्ष संतोष कावले, मेळावा आयोजक भाऊसाहेब काळे, संदीप चव्हाण, रंजनाताई काळे, जयकिशन वाघ, शिवाजी निकम, संदीप बोरसे, प्रतिभा जगताप, अर्चना सोमासे, नामदेव शिंदे, अशोक गायकवाड, घोडके यांची प्रमुख उपस्थिती होती. पाहुण्यांचे स्वागत भाऊसाहेब काळे, पोपटराव सपकाळ, प्रभाकर गायकवाड, संतोष हरणे, मनोहर वडजे, अंकुश मनगटे, जगन्नाथ प्रांजे यांनी केले.

प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर पाहुण्यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. ज्ञानेश्वर अंभुरे यांनी जिजाऊ वंदना सादर केली. त्यानंतर पाहुण्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यांनी परिचयपत्राचे वाचन करून मेळाव्यात सहभागी वधू-वरांना शुभेच्छा दिल्या.

राज्यभरातून वधू-वर

मेळाव्यात राज्यभरातून वधू-वर आपल्या पालकांसह मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. प्रारंभी संयोजकाच्या वतीने वधू आणि वरांना टोकन देऊन व्यासपीठावर आपला परिचय देण्यासाठी पाचारण करण्यात आले. त्यांनी आपला परिचय देत भावी वधू आणि भावी वराकडून आपल्या काय अपेक्षा आहेत, याबद्दल मनोगत व्यक्त केले.

मेळाव्याच्या समारोपप्रसंगी बोलताना ग्रुपचे राज्य समन्वयक पोपटराव सपकाळ यांनी मेळाव्यास मोठ्या संख्येने वधू-वर पालक सहभागी झाल्याबद्दल आभार मानून लवकरच सामूहिक विवाह सोहळा आयोजित करण्यात येईल, असे जाहीर केले. मेळाव्यास बुलंद जावा मराठा युवा परिषदेचे संस्थापक सचिव सुरेश वाकडे, रेखा वाहटुळे, डॉ. दीव्या पाटील, प्रा. रवींद्र नीळ पोपटराव जंजाळ यांच्या सह समाज बांधव भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभारप्रदर्शन अंकुश मनगटे पाटील यांनी केले.

## लोकप्रिय अभिनेत्याचा संशयास्पद मृत्यू

### हॉटेलच्या खोलीत मृतदेह आढळला, पोलिसांचा तपास सुरु

मुंबई - मल्याळम चित्रपट आणि टीव्ही अभिनेता दिलीप शंकर २९ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी त्यांच्या हॉटेलच्या खोलीत मृतावस्थेत आढळले. या बातमीने संपूर्ण फिल्म इंडस्ट्री हादरली आहे. हॉटेलच्या खोलीतून दिलीप शंकर यांचा मृतदेह सापडला असून आता पोलिसांनी तपास सुरू केला आहे. दिलीप शंकर यांनी आत्महत्या केली की नैसर्गिक मृत्यू हे अद्याप समजलेलं नाही.

रिपोर्टनुसार, दिलीप शंकर यांचा मृतदेह तिरुअनंतपुरममधील हॉटेलच्या खोलीमध्ये सापडला आहे. ते 'पाचगणी' या टीव्ही शोचं शूटिंग करत होते आणि त्यासाठी ते गेल्या काही



दिवसांपासून त्याच हॉटेलमध्ये राहत होते. खोलीतून दुर्गंधी येत असल्याचं हॉटेल कर्मचाऱ्यांच्या लक्षात आल्यानंतर दिलीप यांचा मृत्यू झाल्याचं समोर आलं.

दिलीप शंकर गेल्या काही दिवसांपासून हॉटेलच्या खोलीतून बाहेर पडले नव्हते. त्यांना बाहेर येताना कोणीही पाहिलं नव्हतं. मात्र दिलीप शंकर यांचा मृत्यू कसा झाला हे अद्याप समजू शकलेलं नाही. घटनास्थळावरून सुसाईड नोटसारखे काहीही मिळालेलं नाही. दिलीप शंकर यांच्या आकस्मिक निधनामुळे संपूर्ण इंडस्ट्रीत शोककळा पसरली असून चाहत्यांनाही धक्का बसला आहे. पोलीस आता तपास करत आहेत आणि दिलीप शंकर यांचा मृत्यू कसा झाला याचा शोध घेत आहेत. रिपोर्टनुसार, 'पंचाग्नी' दिग्दर्शकाने सांगितलं की, दिलीप शंकर गंभीर आजाराने त्रस्त होते असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. पण या आजाराबद्दल अद्याप समजलेलं नाही. पोलिसांनी अभिनेत्याच्या आकस्मिक निधनाचा तपास सुरू केला आहे. अधिकाऱ्यांकडून मृत्यूचं कारण अद्याप स्पष्ट झालेलं नाही.

## दक्षिण कोरियानंतर कॅनडामध्ये विमानाचा मोठा अपघात!

ओटावा : आज पहाटेच्या सुमारास दक्षिण कोरियामध्ये विमानाचा लँडिंगदरम्यान मोठा अपघात झाल्याची घटना समोर आली आहे. या घटनेनंतर काही तास उलटले असताना पुन्हा विमानाचा अपघात घडल्याची धक्कादायक बातमी समोर आली आहे. एअर कॅनडाच्या विमानाला Halifax Airport वर लॅन्डिंगच्या वेळेस अपघात झाला आहे. या घटनेचा संपूर्ण व्हिडिओ सोशल मीडियावर प्रचमड व्हायरल होत आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, PAL एअरलाइन्सचे विमान क्रमांक AC2259 सेंट जॉन्स येथून टेकऑफ झाले, हॅलिफॅक्स विमानतळावर लॅंडिंगसाठी रनवेवर उतरणार होते. मात्र लँडिंग गिअर तुटल्यामुळे विमानाची चाक घासली गेली असून विमानाला आग लागली आहे. अद्यापही या अपघातात जीवितहानी झाल्याचे समोर आले नाही. मात्र अनेक प्रवासी अपघातात जखमी झाले असून सध्या सर्व जखमींवर उपचार सुरु आहेत.

## इंडिगोचे प्रवासी विमान नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर उतरले!

नवी मुंबई : नवी मुंबईतील आंतरराष्ट्रीय विमानतळाचे काम जवळपास पूर्ण झाले असून लवकरच हे विमानतळ प्रवाशांसाठी सज्ज होणार आहे. काही दिवसांपूर्वीच या विमानतळावर वायुदळाचे सी २९५ आणि सुखोई ३० या विमानांच्या यशस्वी लँडिंगनंतर आज आंतरराष्ट्रीय विमानतळावरून पहिल्या व्यावसायिक विमानाचे लँडिग झाले आहे. त्यामुळे लवकरच ही सेवा सुरु होणार असून नवी मुंबई विमानतळ प्रवाशांना नववर्षाची भेट मिळाली आहे.



विमानतळावर करण्यात आलेली लँडिंग टेस्ट यशस्वी झाल्यानंतर आज इंडिगोचे प्रवासी विमान नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर उतरले.

महिन्याभरापूर्वी नवी मुंबई आज दुपारच्या सुमारास व्यावसायिक विमान नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या रनवेवर लँडिंग केले असून यावेळी सिडको आणि नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ लिमिटेड कंपनीचे अधिकारी उपस्थित होते.

कधीपासून होणार सुरु?

येत्या नववर्षात मार्च महिन्यापर्यंत विमानतळाबाबत सर्व परवानग्या मिळणार असून १७ एप्रिल २०२५ मध्ये पहिले प्रवासी आणि कार्गो विमान सुरू होणार आहे. ही विमानसेवा देशाची सर्वात मोठी कार्गो प्रणाली असल्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापार वाढेल आणि स्थानिक व्यवसायांना चांगलाच फायदा होणार आहे. दरम्यान, १७ एप्रिल रोजी देशांतर्गत विमानसेवेचे उद्घाटन होणार आहे. तर, आंतरराष्ट्रीय विमानसेवेचे उद्घाटन जून महिन्यापर्यंत होईल, असे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे सीईओ बी.व्ही.जेके शर्मा यांनी सांगितले आहे. नवी मुंबई विमानसेवा कार्यान्वित झाल्यानंतर दरवर्षी ९० दशलक्ष प्रवासी हाताळेल अशी अपेक्षा आहे. सध्या ३.७ किमी धावपट्टी ऑपरेशनसाठी तयार आहे, लवकरच दुसरी धावपट्टी बांधण्याची योजना आहे. त्याचबरोबर भूमिगत मेट्रो द्रुतगती मार्ग, अटल सेतू पूल, बुलेट ट्रेन सेवा या बहुविध वाहतूक पर्यायांमुळे विमानतळ प्रवेशयोग्य होईल आणि प्रवाशांचा प्रवास वेळ देखील कमी होणार आहे.

**पाच एकर शेती, घर नावे करण्यावरून वाद**

## पोलिस कर्मचाऱ्याच्या गोळीबारात गंभीर जखमी मेहुण्याचा उपचारा दरम्यान मृत्यु

तभा वृत्तसेवा

हिंगोली, २९ डिसेंबर : शहरातील प्रगती नगर भागातत सासुरवाडीत येऊन पोलिस कर्मचार्याने गोळीबार केल्यानंतर गंभीर जखमी झालेल्या मेहुण्याचा नांदेड येथे रविवारी उपचारा दरम्यान मृत्यू झाला असून गोळीबारात मयत झालेल्यांची संख्या दोन झाली आहे. याप्रकरणी पोलिस कर्मचारी व त्याचे नातेवाईक पाच एकर शेती व प्रगती नगर येथील घर आरोपी पोलिस कर्मचारी विलास मुकाडे याच्या नावे करून देण्याच्या मागणीसाठी त्याच्या पत्नीस शारीरिक व मानसिक त्रास देत असल्याची तक्रार दिल्यावरून रविवारी हिंगोली ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.

वसमत येथील शहर पोलिस ठाण्यात कार्यरत असलेल्या पोलिस कर्मचारी विलास मुकाडे याचा त्याची पत्नी मयुरी मुकाडे यांच्यासोबत वाद झाला होता. त्यामुळे मयुरी ह्या त्यांच्या माहेरी हिंगोली येथील प्रगती नगर येथे आईकडे राहण्यासाठी आल्या होत्या. दि २५ डिसेंबर रोजी रात्रीच्या सुमारास विलास याने पोलिस ठाण्याच्या शस्त्रागारातून पिस्तूल आणि १४ काडतुस चोरून आणले होते. त्यानंतर हिंगोलीत सासरवाडीत येऊन पत्नी मयुरी, सासू वंदना धनवे, मेहुणा योनेश धनवे यांच्यावर गोळीबार केला. या गोळीबारात पत्नी मयुरी हिचा जागीच मृत्यु झाला तर योगेश आणि वंदना हे गंभीर जखमी झाले होते. वंदना यांच्या पोटात गोळी शिरली होती तर योगेश यांच्या शरीरातून तीन गोळ्या आरपार गेल्या होत्या. त्यांच्यावर हिंगोलीच्या शासकीय रूग्णालयात प्राथमिक उपचार करून त्यांना पुढील उपचारासाठी नांदेड येथे हलविले होते. नांदेड येथे त्यांच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली होती. मात्र त्यांची प्रकृती गंभीर असल्याने शस्त्रक्रियेनंतर त्यांना व्हेंटीलेटरवर ठेवण्यात आले होते. त्यानंतर आज सकाळी अकरा वाजण्याच्या सुमारास योगेश यांचा मृत्यू झाला.

या प्रकरणी दि २९ डिसेंबर रोजी नंदकिशोर धनवे यांनी हिंगोली ग्रामीण पोलिस ठाण्यात विलास मुकाडे याच्यासह आई वडील तसेच नातेवाईक मयुरीचे लग्न झाल्यानंतर एक वर्षांनी कळमनुरी तालुक्यातील वाई येथील पाच एकर शेती आणि हिंगोली येथील प्रगती नगरमधील घर विलास मुकाडे याचे नावे करून देण्याची मागणी करीत शारीरिक व मानसिक छळ करीत असल्याची तक्रार दिली. याप्रकरणी हिंगोली ग्रामीण पोलिस ठाण्याचे पोनि शामराव डोंगरे यांनी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली असून रविवारी आरोपी विलास मुकाडे यास न्यायालयासमोर हजर करण्यात आले आहे.

## देशमुख हत्येची चौकशी होईपर्यंत धनंजय मुंडेंचा राजीनामा घ्यावा : विजय वडेट्टीवार

तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि.२९ डिसेंबर : सरपंच संतोष देशमुख यांना न्याय मिळण्मोयासाठी मोठा मोर्चा काढून देखील सरकार जागे झाले नाही. या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी व्हावी म्हणून धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेतला पाहिजे त्याशिवाय न्याय मिळणार नाही ,अशी मागणी माजी विधानसभा विरोधी पक्ष नेते आ.विजय वडेट्टीवार यांनी रविवारी पत्रकारांशी बोलताना केली.

संतोष देशमुख हत्या प्रकरणात वाल्मीक कराडला अजून अटक होत नाही. हिवाळी अधिवेशनात मुख्यमंत्र्यांनी सूत्रधाराला अटक करू, आरोपींवर मकोका लावू अश्या मोठ्या घोषणा केल्या पण अजून अटक का होत नाही? वाल्मीक कराड हा सरकारचा जावई आहे का असा सवालही वडेट्टीवार यांनी उपस्थित केला. ते म्हणाले, बीडमध्ये बिहार सारखी परिस्थिती झाली आहे. अनेक जमिनी लुटल्या, खंडणी मागितली जातात, महिलांवर अत्याचार होतात. संतोष देशमुख यांच्या हत्येसारखे प्रकरण होऊन पोलीस वाल्मीक कराडला अटक का करू शकत नाही? परभणीमध्ये भीमसैनिकांवर कारवाई करताना पोलिसांना धार येते मग बीडमध्ये पोलिसांना लकवा मारला आहे का,? देशमुख यांचा अमानुषपणे खून झाला, त्यांच्या मुलीचे अश्रू सरकारला दिसत नाही का? याचा सूत्रधार वाल्मीक कराडची नार्को टेस्ट झाली पाहिजे. आतापर्यंत बीड मध्ये झालेल्या हत्या, खंडणी, महिला अत्याचार सगळ्या प्रकरणाची चौकशी झाली पाहिजे, अशी मागणीही वडेट्टीवार यांनी केली.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# स्था.स्व.सं.निवडणुकांमध्ये भगवा फडकविण्यासाठी कामाला लागा : जगताप, मुळूक, गलधर

## बीड जिल्हा शिवसेनेची बैठक संपन्न!



बीड, प्रतिनिधी- बीडसह राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका गेल्या काही वर्षांपासून रखडल्या होत्या. विधानसभा निवडणुकीनंतर आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा बिगुल वाजणार आहे. राज्यात शिवसेनेला मिळालेल्या यशानंतर बीड जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेमध्येही शिवसेनेचा भगवा फडकवण्यासाठी शिवसेनेने तयारी सुरु केली आहे. महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते ना. एकनाथजी शिंदे साहेब आणि संसदरत्न खासदार डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांच्या आदेशानुसार बीड जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या अनुषंगाने काल रविवार, दि.२९ डिसेंबर रोजी बीड जिल्हा शिवसेनेची बैठक दुपारी बारा वाजता हॉटेल ग्रॅड यशोदा येथे संपन्न झाली.

शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अडीच वर्षांच्या मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळात राज्याला प्रगतीपथावर नेले आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेसह विविध योजना राबवून महिलांना स्वावलंबी करण्याचा प्रयत्न शिंदे यांच्या कार्यकाळात झाला. मुख्यमंत्री असताना एकनाथ शिंदे यांनी केलेल्या उल्लेखनिय कामामुळे विधानसभा निवडणुकीत शिवसेनेला मोठे यश मिळाले असून राज्यात पुन्हा महायुतीची सत्ता आली. आता राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये देखील शिवसेनेची सत्ता यावी, या दृष्टीने शिवसेना तयारीला लागली असून मजबुतीने पुढे जाणार आहे.

बीड जिल्ह्यात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये शिवसेनेचा भगवा फडकविण्यासाठी पूर्ण तयारीने कामाला लागा असे मत शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन भैय्या मुळूक, स्वप्नील भैय्या गलधर यांनी व्यक्त केले. दरम्यान यावेळी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसंदर्भात प्रभाग निहाय गण, गटनिहाय नियोजन व चर्चा झाली. याप्रसंगी बीड जिल्ह्यातील शिवसेना, महिला आघाडी, युवासेना, शेतकरी सेना व सर्व अंगीकृत संघटनेचे सर्व पदाधिकारी आजी-माजी लोकप्रतिनिधी व शिवसैनिकांनी उपस्थित होते.

# तालुक्यासाठी अत्याधुनिक रुग्णवाहिका उपलब्ध करा

## आ. संजना जाधव यांच्याकडे निवेदनाव्दारे केली मागणी



तभा वृत्तसेवा

कन्नड :- तालुक्यातील रुग्णांसाठी अत्याधुनिक रुग्णवाहिका उपलब्ध करून द्यावी अशा मागणीचे निवेदन शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे वैद्यकीय सहाय्यक संतोष पवार यांनी विद्यमान आमदार संजना जाधव यांच्याकडे केली आहे

या निवेदनात म्हटले आहे की,तालुक्यातुन राष्ट्रीय महामार्गा सोलापूर धुळे जात असून यामुळे अपघाताच्या प्रमाणात वाढ झालेली आहे,कन्नड शहरातुन रुग्णांना जिल्ह्याच्या रुग्णालयात दाखल करण्यासाठी शासकीय रुग्णवाहिका उपलब्ध असून,त्यामध्ये रुग्णांना लागणाऱ्या सुविधा नसल्याने रुग्णांचा जीव धोकादायक परिस्थिती मध्ये असतो त्यामुळे आपण तालुक्यातील जनतेच्या या प्रश्नाला न्याय द्यावा अशी मागणी निवेदनात केली आहे.

## गंगाखेडच्या अन्नपूर्णेला साश्रू नयनांनी निरोप

गंगाखेड ता.२९: शहरातील मागील ४० वर्षापासून घरगुती मेस चालवणाऱ्या व प्रत्येकाच्या तोंडी ताई, मावशी, आत्या असं नाव



असणाऱ्या राधाबाई हनुमानदास भंडारी ज्या गंगाखेड शहर व परिसरात साक्षात अन्नपूर्णा म्हणून ओळखल्या जात, त्यांचे वयाच्या ८५ व्या वर्षी दिनांक २८ डिसेंबर रोजी निधन झाले.

शहरांमध्ये शिक्षणाच्या निमित्ताने येणारे विद्यार्थी, नोकरीच्या निमित्ताने येणारे कर्मचारी, बँकेतील कर्मचारी या एक ना अशा कितीतरी जणांना आपल्या हातचे चविष्ट, रुचकर जेवण आत्मीयतेने जेवु घालणाऱ्या राधा मावशी यांच्या जाण्याने शहर व परिसरात शोककळा पसरली.

येथील संत मोतीराम महाराज यांच्या दर्शनासाठी जाणे व प्रत्येक दिवाळीमध्ये संतश्रेष्ठ गजानन महाराज यांच्या शेगाव या ठिकाणी त्या जात असत. अत्यंत शांत, संयमी, आध्यात्मिक, मायाळू अशी ओळख असलेल्या या राधा मावशींना गंगाखेड शहर व परिसरातील सर्व नागरिकांच्या वतीने गोदा काठावरील स्मशानभूमीत श्रद्धांजली वाहून अखेरचा निरोप देण्यात आला.

# मराठा सेवा संघाची मुदखेड तालुका कार्यकारणी जाहीर



**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड,दि. २९ डिसेंबर**

दि. २८ डिसेंबर रोजी राजर्षी शाहू विद्यालय मुदखेड येथे दुपारी चार वाजता मराठा सेवा संघाची तालुका कार्यकारणी निवडीची बैठक पार पडली. प्रथमता जिजाऊ वंदनेने जिजाऊ प्रतिमेचे व बहुजन प्रतिपालक शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पुजन जिल्हा उपाध्यक्ष शिवश्री हौसाजीराव गाढे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली सदरील मराठा सेवा संघाच्या बैठकीस जिल्हाध्यक्ष शिवश्री पंडितराव कदम व ड सतीश कुमार जाधव, श्री खुडे सर व कदम सर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

बैठकीस मराठा कर्मचारी व समाज बांधव उपस्थित होते अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांनी

सर्वांशी चर्चा करून सर्वांनु मते मुदखेड तालुका सेवा संघाच्या अध्यक्षपदी शिवश्री शिवानंद पवार निवघेकर यांची निवड करण्यात आली व तालुका कार्याध्यक्षपदी शिवश्री प्राचार्य अजय सरसे तालुका सचिव पदी सचिन पाटील मगरे, कोषाध्यक्षपदी व्यंकटराव नन्नवरे सर तालुका संघटक पदी शिवश्री पंडितराव पाटील व दीपक शेळके, सल्लागारपदी प्रा आनंदराव वडजे ,सहसंघटक पदी गणेशराव शिंदे व तालुका उपाध्यक्षपदी बाबुराव कदम,दादाराव शिंदे ,सूर्यभान शिंदे ,व्यंकटराव मोरे व प्रसिद्धी प्रमुख पदी प्रतापराव पवळे या पदाधिकाऱ्यांची एकमताने निवड करण्यात आली

सदरील मराठा सेवा संघाच्या बैठकीस जिल्हाध्यक्ष शिवश्री पंडितराव कदम एडवोकेट सतीश कुमार जाधव जिल्हा उपाध्यक्ष हौसाजीराव गाढे यांनी मराठा सेवा संघाच्या वाटचालीविषयी सविस्तर मार्गदर्शन केले

सदरील बैठकीस तालुक्यातील हनुमंत नटूरे, ऋषिकेश पारवेकर ,प्राध्यापक बालाजी जाधव ,अमोल आबादार ,माधव गाढे पंडित गाढे मराठा आंदोलन मारुती गाढे सर सिंधीकर, शिंदे सर, पुयड सर, नागेलीकर ,कराळे सर, पवार सर ,अनिल पाटील व इतर असंख्य समाज बांधवांची उपस्थीती होती.

# सावरकर महाविद्यालयाचे समाजासाठीचे कार्य कौतुकास्पद - डॉ.अमोल गीते

## स्वा.सावरकर महाविद्यालयातील आरोग्य शिबिराचा समारोप



बीड (प्रतिनिधी) : शिक्षण क्षेत्रात काम करत असतानाही समाजाप्रती आपले काही देणे आहे या भावनेने सावरकर महाविद्यालयाने आरोग्य शिबिर आयोजित केले याचा लाभ परिसरातील नागरिकांनी घेतला.महाविद्यालयाचे हे कार्य कौतुकास्पद आहे असे प्रतिपादन इंडियन मेडिकल असोसिएशनचे सचिव डॉ. अमोल गीते यांनी केले.

स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयात आयोजित सात दिवसीय आरोग्य शिबिराच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सावरकर संकुलाचे कार्यवाह डॉ. अविनाश देशपांडे हे होते. पुढे बोलताना डॉ. अमोल गीते म्हणाले की मॉडर्न आणि अल्टरनेटिव्ह मेडिसिन या दोन्हीही पद्धती महत्त्वाच्या आहेत. क्युप्रेशर च्या उपचाराने अनेकदा रुग्णांना लाभ होतो.भविष्यात महाविद्यालयाने आयुष्यमान भारत चे हेल्थ कार्ड काढण्यासाठी शिबिर घ्यावे आय. एम. ए देखील सोबत असेल. प्राचार्य डॉ. सुहास मोराळे म्हणाले की गुणवत्तेबरोबर सामाजिक सामाजिक बांधिलकी जोपासण्याचा प्रयत्न महाविद्यालयाने केला आहे. कार्यवाह डॉ. अविनाश देशपांडे म्हणाले की या शिबिराचा लाभ परिसरातील नागरिकांना झाला याचे समाधान आहे.भविष्यात आणखी असे शिबरे आयोजित केली जातील. प्रास्ताविकात क्रीडा विभाग प्रमुख छत्रपती पांगरकर यांनी शिबिराची माहिती दिली. डॉ. स्वाती कुलकर्णी डॉ. अनुजा कास्तीकर, डॉ. अरविंद रायल वार या शिबिरार्थींनी मनोगत व्यक्त केले. या वेळी डॉ. सचिन कंदले यांची विद्यार्थी परिषदेच्या देवगिरी प्रांत अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर यांनी केले तर आभार उपप्राचार्य डॉ. उत्तम साळवे यांनी मानले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थी प्राध्यापक, कर्मचारी यांची उपस्थिती होती.

## महिलांसाठी खास जीवन विमा उद्योगातील पहिली योजना

छत्रपती संभाजीनगर : आयसीआयसीआय प्रुडेंशियल लाइफ इन्शुरन्सने महिलांसाठी डिझाइन केलेली ' आयसीआयसीआय प्रू विश' ही योजना लाँच केली आहे. जीवन विमा उद्योगातील आयसीआयसीआय प्रुडेंशियल लाइफ इन्शुरन्सची ही योजना क्रांतीकारी पाऊल मानले जात आहे. आयसीआयसीआय प्रु विश योजनेतून महिलांना स्तन, गर्भाशय, गर्भाशयाचे कर्करोग आणि हृदयविकार यांसारख्या गंभीर आजारांच्या निदानासाठी आरोग्य विमा कवच रकमेच्या १००% पर्यंत त्वरित परतावा दिला जाईल. महत्त्वाचे म्हणजे, प्रीमियमची रक्कम ३० वर्षांच्या कालावधीसाठी स्थिर राहणार आहे. ज्यामुळे विमा धारकाला त्यांच्या निधीचे अधिक चांगल्या पद्धतीने नियोजन करता येईल. या उत्पादनाचे आणखी एक उल्लेखनीय वैशिष्ट्य म्हणजे प्रीमियम हॉलिडे. यातून वीमा धारकाला प्रीमियम भरण्याच्या कालावधीत कधीही १२ महिन्यांच्या कालावधीसाठी प्रीमियम भरण्याचा पर्याय मिळणार आहे.विशेष म्हणजे, यात विमा धारक महिलेला मातृत्वाशी संबंधित गुंतागुंत आणि नवजात बाळाच्या जन्मजात आजारांशी संबंधित विमा संरक्षण घेण्याचा पर्याय देखील मिळेल.

## के.व्ही. गायकवाड यांची नियुक्ती



वाळूज महानगर (प्रतिनिधी) : वाळूज महानगरातील जेष्ठ आंबेडकरवादी नेते के.व्ही. गायकवाड यांच्या चळवळीच्या कार्याची दखल घेऊन त्यांची रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडिया (डेमोक्रेटीक) पक्षाचे प्रभारी प्रदेश अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्यांना पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस विशाल नावकर यांच्या स्वाक्षरीने निवडीचे पत्र देण्यात आले आहे. के.व्ही. गायकवाड यांच्या निवडीबद्दल परिसरातील मान्यवरांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# वसमतच्या केंब्रिज महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी शेख जावेद सीए परीक्षेत यशस्वी

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २९ डिसेंबर**

वसमत शहरातील केंब्रिज कनिष्ठ महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी शेख जावेद शेख गुलाब रा. माळवटा,ता.वसमत या युवकाने नोव्हेंबर २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या सी.ए. अर्थात सनदी लेखापाल परीक्षेत यश मिळवले असून २६ डिसेंबर २०२४ मध्ये या परीक्षेचे निकाल घोषीत करण्यात आले आहेत. अतिशय प्रतिकूल परिस्थितीतून शिक्षण घेतलेल्या जावेदने ग्रामीण भागातील तरुणाई पुढे एक वेगळा आदर्श निर्माण केला आहे. जावेदचे कुटूंब वसमत तालुक्यातील माळवटा येथे राहते.



कुटुंबात आई,वडिल,तीन भाऊ आणि एक बहिण असा त्यांचा परिवार आहे. घरी चार एकर जमीन असून वडीलांना आर्थिक हातभार लावण्यासाठी दोन्ही भावंडे काम करतात. जावेदचे पदवीचे शिक्षण नांदेडला पूर्ण झाले. बी.कॉम च्या शेवटच्या वर्षात त्याला सीए च्या परीक्षेबद्दल अधिकची माहिती मिळाली. तेथूनच त्याने सीए अर्थात सनदी लेखापाल होण्याचा मनी चंग बांधला. जावेदने काही काळ पुण्यात राहून सीए च्या अंतिम परीक्षेची तयारी केली.पहिल्या काही प्रयत्नात तो अपयशी झाला,परंतु त्याने जिद्द सोडली नाही.तीन वेळा अपयशी झाल्यानंतर शेवटी चौथ्या प्रयत्नात तो यशस्वी झाला आहे. मनाचा निश्चय दृढ असेल आणि स्वतः च्या प्रयत्नांवर विश्वास असेल तर कोणतीही परीक्षा उत्तीर्ण होणे

शक्य आहे,असे तो म्हणतो. स्वतः कष्ट करीत अर्थाजन करत त्याने मिळवलेलं यश इतरांसाठी प्रेरणादायी असेच आहे. जावेदच्या या यशाबद्दल केंब्रिज कनिष्ठ महाविद्यालयाचे अध्यक्ष मा. प्रा. पी. एन. बहिरे, प्राचार्य जगताप, उपप्राचार्य वानखेडे सर, समन्वयक प्रा. राजेगोरे आर. एस .पर्यवेक्षक प्रा. राजेगोरे ए.बी., प्रा. चव्हाण डी.एस., प्रा. कोरडे टि.एन. प्रा. कमळू एल डी आणि सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी जावेदच्या यशाबद्दल त्याचे अभिनंदन केले आहे.

## १२ जानेवारीला प्रदेश भाजपाचे शिर्डीत राज्यस्तरीय अधिवेशन



अहिल्यानगर : महाराष्ट्र प्रदेश भारतीय जनता पार्टीचे महा अधिवेशन १२ जानेवारी रोजी शिर्डी येथे होणार आहे. पार्टीचे वरिष्ठ नेते व पदाधिकारी हे राज्यातील सुमारे १५००० पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. या अधिवेशनाच्या नियोजनासाठी प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली एक बैठक नुकतीच पार पडली.

अधिवेशनाच्या अनुषंगाने बैठक व्यवस्था, भोजन व्यवस्था, पार्किंग, व्हीआयपी कक्ष, स्वागत कक्ष, आदींचे नियोजन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनानुसार सुरू आहे.

या नियोजन बैठकीला विधान परिषदेतील पक्षाचे मुख्य प्रतोद प्रवीण दरेकर, प्रदेश महामंत्री रणधीर सावरकर, प्रदेश सरचिटणीस विजय चौधरी, कार्यालयीन प्रभारी रवी अनासपुरे, मंत्री मा. आ. स्नेहलताताई कोल्हे, मा. खा. सुजय विखे पाटील, आ. शिवाजीराव कर्डिले, आ. मोनिकाताई राजळे, आ विक्रम पाचपुते, भाजपाचे नूतन उत्तर जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, शहर जिल्हाध्यक्ष अभय आगरकर, दक्षिण जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, बाबासाहेब वाकळे, सचिन पारखी आदींसह भारतीय जनता पार्टीच्या उत्तर व दक्षिण जिल्ह्यातील पदाधिकारी सदस्य उपस्थित होते.

# सदस्य नोंदणीसाठी प्रत्येक घरी पोहोचा :अल्पसंख्याक प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी

## सोयगावात भाजपा सदस्यता नोंदणी अभियान बैठकीत पळासखेडा सरपंचाचा भाजपात प्रवेश

तभा.वृत्तसेवा
सोयगाव,दि.२९ डिसेंबर

भारतीय जनता पार्टी सोयगाव-सिल्लोड सदस्यता नोदणी अभियानांतर्गत एक लाख सदस्य नोंदणी करणार आहे. कार्यकर्त्यांनी आपल्या मेहनतीने विधानसभा निवडणुकीच्या ऊर्जा आणि एकजुटीच्या माध्यमातून स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्येही यश मिळवण्यासाठी प्रत्येक घराघरात पोहोचण्याचे काम या सदस्यता अभियानाद्वारे करावे लागेल,असे आवाहन भाजपचे अल्पसंख्याक प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी यांनी शुक्रवारी सायंकाळी सात वाजता भाजपा कार्यालय सोयगाव येथे आयोजित बैठकीत केले.



सोयगाव शहरातील भाजप कार्यालयात आयोजित सदस्यता नोंदणी अभियान बैठकीत ते बोलत होते. देशभरात चालू असलेल्या भाजप सदस्यता नोंदणी अभियानाच्या धर्तीवर तालुक्यातील अभियानाची सुरुवात करण्यात आली.मंडळ स्तरावर कार्यशाळा आयोजित करून सदस्य नोंदणी करावी आणि अधिकाधिक लोकांना भाजपशी जोडण्यासाठी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी योगदान द्यावे.भारतीय जनता पार्टी संघटनात्मक काम करणारी पार्टी असून,लोकसभेमध्ये दोन सदस्य ते आज देशातील एक नंबरचा पक्ष त्याचबरोबर जगभरातील सर्वात मोठा सदस्य असणारा पक्ष अशी वाटचाल करणाऱ्या भाजपाचे स्वप्न अटलजींनी पाहिले होते ते आज पूर्ण होत असून,या गोष्टीचा अभिमान असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी भाजप शहराध्यक्ष योगेश पाटील,माजी नगराध्यक्ष कैलास काळे,सिल्लोडचे तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर मोठे,सोयगाव चे तालुकाध्यक्ष बद्री राठोड, माजी पंचायत समिती सदस्य संजीवन सोनवणे,वसंत बनकर,राजेंद्र जावळे,सुनील गंवाडे,सुनील ठोंबरे,ईश्वर क्षीरसागर,मंगेश सोहनी,प्रमोद पाटील,मयूर मनगटे,दिलीप पाटील(जरंडी)जरंडी चे उपसरपंच संजय पाटील,दीपक पाटील,संजय चौधरी,संजय मंडवे,अजय पाटील,भावराव पाटील,अमृत राठोड आदींची उपस्थिति होती

पळसखेडा ता.सोयगाव येथील सरपंच राजेंद्र रेकनोद यांचा प्रवेश

दरम्यान यावेळी पळसखेडा येथील सरपंच राजेंद्र रेकनोद यांनी भाजप मध्ये अल्पसंख्याक प्रदेश अध्यक्ष ईदरीस मुलतानी, ज्ञानेश्वर मोठे यांच्या हस्ते प्रवेश केला.

# पतंग उडवताना दक्षता घेण्याचे आवाहन

अहिल्यानगर : आपल्याकडे मकर संक्रांती दरम्यान पतंग उडविण्याची प्रथा आहे. मकर संक्रांत पूर्वी साधारणतः एक महिना अगोदर पतंग उडविण्यास सुरुवात होते. कटलेला पतंग पकडण्यासाठी धावताना विहिरीत पडून दोन अल्पवयीन मुलांचा मृत्यू झाल्याची दुःखद घटना नुकतीच नगर तालुक्यात घडली आहे. तसेच घराच्या इमारतीच्या छतावर पतंग उडवताना भान नसल्यामुळे इमारतीवरून खाली पडून अनेकांचा मृत्यू झाल्याच्या घटना घडलेल्या आहेत. प्रतिबंधित नायलॉन मांजाच्या वापरामुळे देखील गंभीर दुखापत होऊन अनेकांचा मृत्यू झालेला आहे. धारदार प्रतिबंधित मांजामुळे गळा, कान आदी शरीराचे भाग कापले जाणे, पक्षी - प्राण्यांच्या जीवितास धोका निर्माण होणे आदी गंभीर घटना घडलेल्या आहेत. याचबरोबर पतंग उडविण्याच्या आनंदात अनेक जण मोठ्या कर्कश आवाजात डीजे लावून जल्लोष करतांना आढळतात. या सर्व बाबींचा विचार करता नगर शहरातील तमाम जनतेस आव्हान करण्यात येते की, पतंग उडविण्याचा आनंद घेत असताना आपल्यामुळे इतरांना इजा / अपघात होणार नाही, कर्कश आवाजाच्या डीजेमुळे आजूबाजूच्या लोकांना ध्वनी प्रदूषणाचा त्रास होणार नाही याची सर्वांनी दक्षता घ्यावी. पतंग उडविणाऱ्या मुलांकडे पालकांनी लक्ष ठेवावे. मुलांनी देखील कटलेला पतंग पकडण्यासाठी बेभान होऊन सैरावैरा पळू नये. पाच दहा रुपयाचा कटलेला पतंग पकडण्यासाठी आपला अनमोल जीव धोक्यात घालू नये असे आवाहन शहर विभागाचे पोलीस उपअधीक्षक अमोल भारती यांनी केले आहे. शहरात कुठेही प्रतिबंधित मांजाचा वापर करतांना कोणी आढळल्यास तसेच मकर संक्रांतीच्या दिवशी कर्कश डीजेमुळे ध्वनी प्रदूषण होत असल्याचे निदर्शनास आल्यास अथवा तशा तक्रारी पोलीस ठाण्यात प्राप्त झाल्यास संबंधितांवर तात्काळ कायदेशीर कारवाई करण्यात येईल. याची सर्वांनी नोंद घ्यावी.

# जि.प.प्रा.शाळा जंगलातांडा येथे सोयगाव केंद्रस्तरीय शिक्षण परिषद संपन्न

तभा.वृत्तसेवा
सोयगाव,दि.२९ डिसेंबर

भारताचे माजी पंतप्रधान डॉ.मनमोहनसिंग यांचे दुःखद निधन झाल्याने देशात ७ दिवसांचा राष्ट्रीय दुखवटा घोषित करण्यात आल्याने आणि प्रशासनाने पत्रात सूचित केल्याप्रमाणे स्वागत सत्काराला फाटा देत भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करित

केंद्र स्तरावरील शिक्षण परिषद कार्यशाळा शनिवारी दि.२८ रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जंगलातांडा ता. सोयगाव येथे मंगलमय वातावरणात संपन्न झाली.

फिरोज तडवी केंद्र प्रमुख शिक्षण परिषदेस उपस्थितांना संबोधित करतांना म्हनता की,विद्यार्थ्यांची गुणवत्ता जर भर वाढवायचीअसेल तर सर्व शिक्षकांनी आळसपना झटकून शैक्षणिक कारियला हवं विद्यार्थीनी सुध्दा आपले हिता करिता यश डोळ्यासमोर ठेवले ठेवत न्यानार्जण केलेच पाहिजे,तूम्ही नाविन्यपूर्ण उपक्रमात भाग घेऊन आपल्या गुणवत्तेत भर घालू शकतो असे आशावादी असायला



पाहिजे,त्याचप्रमाणे आपला दैनंदिनअध्यापन रंजक करण्यासाठी लागणारे शैक्षणिक साहित्य गरजेचे असते ते बाळगायला ही शिका. केंद्र स्तरावरील शिक्षण परिषद मंचावर तडवी बोलतांना म्हणाले.

मंचावर फर्दापूर केंद्राचे केंद्रप्रमुख अण्णासाहेब पोळ, केंद्रीय मुख्याध्यापक मोतीराम जोहरे,शाळेचे मुख्याध्यापक रामदास फुसे,मुख्याध्यापक किरणकुमार पाटील,मुख्याध्यापक प्रकाश वंजारी,उपस्थित होते.त्याचबरोबर सोयगाव केंद्रांतर्गत शाळेतील मुख्याध्यापक,शिक्षक,अतिथी निदेशक, युवा प्रशिक्षणार्थी शिक्षक बंधू-भगिनी पालक यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

पुढे संबोधित करतांना तडवी म्हणतात गणित,विज्ञान, इंग्रजी पेटीचा वापर करून विद्यार्थ्यांना १०० दिवसातच सहज वाचन आणि लेखन सुद्धा आपण शिकवू शकतो.त्या सोबत शिक्षकाच्या अध्ययन स्तर निश्चिती मध्ये प्रगती दिसून येते त्या साठी सर्व शिक्षक बंधू शिक्षिकां बंधू - भगिनींनी प्रयत्न पराकाष्ठा करणे गरजेचे आहे,असे प्रतिपादन तडवी यावेळी यांनी केले.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी दशसूत्री कार्यक्रमाविषयी व अध्ययन स्तर निश्चिती,अध्ययन निष्पत्ती

रामदास फुसे जंगलातांडा मुख्याध्यापक यांनी शाळेच्या एकंदरीत शैक्षणिक व भौतिक प्रगती विषयी सविस्तर मार्गदर्शन केले.Target peak app चा वापर व उपयोग करण्यासंबंधी पालकांशी संवाद साधण्यासाठी सर्व शिक्षकांना प्रेरित केले.अपार आय.डी.सुरक्षा व सुरक्षितता, उल्हास aap वर असा अक्षरांची नोंदणी,निपुण अंतर्गत माता पालक गटाची कार्यवाही,याविषयी चर्चा घडवून आणली व अंमलबजावणी विषयी माहिती दिली.

शैक्षणिक साहित्य प्रदर्शन सुध्दा आयोजित करण्यात आलेले होते केंद्रांतर्गत शाळेतील शिक्षकांनी वेगवेगळ्या प्रकारचे शैक्षणिक साहित्य तयार करून आणलेले दिसून आले. जंगलातांडा येथील ग्रामपंचायत सरपंच विशाल चव्हाण,उपसरपंच फकीरा कल्याणकर,पोलीस पाटील एकनाथ राठोड,पदम राठोड,शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दयाराम राठोड,माजी अध्यक्ष विजय राठोड,शाळा व्यवस्थापन समिती सदस्य योगेश कल्याणकर,पंचायत समिती शिक्षण विभाग प्रतिनिधी सुपडू सोनवणे यांची शिक्षण परिषदेस उपस्थिती होती.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जंगलातांडा येथिल मुख्याध्यापक व सर्वशिक्षक यांनी परिश्रम घेतले प्रा. शा.जंगलातांडा येथील सहशिक्षक राहूल सोनार यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.

## जाहिर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

जा.क्र. २०२४/मशाका/जमाबंदी-१/जन्म-मृत्यु नोंद/सिआर-७३७
उपविभागीय अधिकारी कार्यालय
कन्नड दिनांक १९/१२/२०२४

अर्जदार : विठ्ठल संपतराव जंजाळ रा बनशेन्द्रा ता कन्नड जि छ संभाजीनगर
विरूध्द
गैरअर्जदार : ग्रामपंचायत कार्यालय बनशेन्द्रा ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विषय : जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी अर्ज सादर करून अर्जदार यांच्या मुलगा सुशील विठ्ठल जंजाळच्या जन्म प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल के ला आहे की, अर्जदार यांच्या मुलगा सुशील विठ्ठल जंजाळचा जन्म दिनांक २३/०९/१९९६ रोजी बनशेन्द्रा ता. कन्नड / ता. खुलताबाद येथे झालेला आहे.

अर्जदार यांच्या मुलगा सुशील विठ्ठल जंजाळचा जन्म दिनांक २३/०९/१९९६ रोजी बनशेन्द्रा ता. कन्नड / ता. खुलताबाद येथे झालेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांच्या मुलगा सुशील विठ्ठल जंजाळचा जन्म दिनांक २३/०९/१९९६ रोजी बनशेन्द्रा येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हनजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक १४-०१-२०२५ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक २३/०९/१९९६ रोजी बनशेन्द्रा येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीत नंतर आलेला उजर/आक्षेप ग्राह्य धरलाजाणार नाही.

करिता दिनांक १९/१२/२०२४ रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

## जाहिर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

जा.क्र. २०२४/मशाका/जमाबंदी-१/जन्म-मृत्यु नोंद/सिआर-७३९
उपविभागीय अधिकारी कार्यालय
कन्नड दिनांक १९/१२/२०२४

अर्जदार : विठ्ठल संपतराव जंजाळ रा बनशेन्द्रा ता कन्नड जि छ संभाजीनगर
विरूध्द
गैरअर्जदार : ग्रामपंचायत कार्यालय बनशेन्द्रा ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विषय : जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी अर्ज सादर करून अर्जदार यांच्या मुलगी निकिता विठ्ठल जंजाळच्या जन्म प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल के ला आहे की, अर्जदार यांच्या मुलगी निकिता विठ्ठल जंजाळचा जन्म दिनांक ०८/०८/२००० रोजी बनशेन्द्रा ता. कन्नड / ता. खुलताबाद येथे झालेला आहे.

अर्जदार यांच्या मुलगी निकिता विठ्ठल जंजाळचा जन्म दिनांक ०८/०८/२००० रोजी बनशेन्द्रा ता. कन्नड / ता. खुलताबाद येथे झालेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांच्या मुलगी निकिता विठ्ठल जंजाळचा जन्म दिनांक ०८/०८/२००० रोजी बनशेन्द्रा येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हनजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक १४-०१-२०२५ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक ०८/०८/२००० रोजी बनशेन्द्रा येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीत नंतर आलेला उजर/आक्षेप ग्राहय धरलाजाणार नाही.

करिता दिनांक १९/१२/२०२४ रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

# वनवसींच्या कार्यक्षमतेला वाव देणारे उपक्रम राबवणे गरजेचे

## माध्यमतज्ज्ञ डॉ. धारूरकर यांचे प्रतिपादन

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी

विरळ होत चाललेली जंगले, वने यामुळे वनवासी यांचे नैसर्गिक संसाधने नष्ट होत चालली आहेत. त्यामुळे त्यांच्या गरजेनुरूप त्यांना सक्षम बनवणारी यंत्रणा उभारावी लागेल तसेच त्यांच्या कार्यक्षमतेला वाव देणारे उपक्रम राबविणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन प्रसिद्ध माध्यमतज्ज्ञ डॉ. वि. ल. धारूरकर यांनी येथे केले. अध्यक्षस्थानी मुंबई उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती अंबादास जोशी होते.

छत्रपती संभाजीनगरमधील देवगिरी कल्याण आश्रमाच्या वतीने गुरुवारी, २६ डिसेंबर रोजी आयोजित अखिल भारतीय वनवासी कल्याण आश्रमाचा स्थापना दिवस समारोह उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून डॉ. धारूरकर बोलत होते. डॉ. धारूरकर यांनी कल्याण आश्रमाचा स्थापन उद्देश, कार्य या बाबत विस्तृत माहिती दिली.



अडचणी लक्षात घ्याव्यात

डॉ. धारूरकर म्हणाले, आदिवासी बांधवांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठीचे प्रयत्न करताना त्यांची आहार, संस्कृती, राहणीमान यावर विपरित परिणाम तर होणार नाहीना याचा अभ्यास करावा लागेल. आदिवासी, वनवासी व जनजाती रहिवासी भागात प्रत्यक्ष भेटी देवून त्यांच्या गरजा, अडचणी व त्यांनी सुचविलेले पर्याय विचारात घेऊन उपक्रम राबविण्यात यावेत, असे धारूरकर म्हणाले.

उपक्रमांची प्रशंसा

देवगिरी कल्याण आश्रम द्वारे चालू असलेले विविध कार्याची, आरोग्य रक्षक, रक्षाबंधन , दिवाळी फराळ वाटप, रथ यात्रा, बाल संस्कार वर्ग, युवा चेतना शिबिर, गुणवंत विद्यार्थी सत्कार, हितरक्षा जनजागृती आदी विविध आयामांची डॉ. धारूरकर यांनी प्रशंसा केली. शेवटी पसायदान आणि नंतर स्नेहाभोजनाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## पाटेगाव पुलावर सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याची गरज

पैठण दि २९ :- पैठण लगतच्या गोदावरी पात्रावरील पटेगाव पुलावर अनेक संशयास्पद घटना घडत असून या घटना रोखण्यासाठी पुलावर सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याची गरज निर्माण झाली आहे.

काही महिन्यांपासून पैठण-शेवगाव रस्त्यावरील पाटेगाव पुलावरून उडी घेऊन गोदावरी पात्रात आत्महत्या करण्याचा घटना घडत आहेत. डॉक्टर महिलेची मुलासह आत्महत्या करण्याची घटना ताजी असतांना शनिवार दिनांक २८ डिसेंबर रोजी दुपारी याठिकाणी एका वृद्ध महिलेचे शव पाण्यात तरंगतांना आढळून आले. याप्रकरणी पैठण पोलिसांत अनोळखी वृद्ध महिलेच्या अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.सदरील मृत वृद्ध महिलेची ओळख अद्याप पटली नसून या महिलेने स्वतः आत्महत्या केली की कुणी त्यांना मृत अवस्थेत तेथे आणून टाकले हा प्रश्न उपस्थित होत आहे. अनोळखी वृद्ध महिलेच्या मृत्यू बाबत असे प्रश्न सध्या अनउत्तरीत असून पैठण पोलीस याचा शोध घेत आहेत. अश्या घटना पुलावर घडल्यास घटनेचे नेमके सत्य बाहेर येण्यासाठी पाटेगाव पुलावर सेफ्टीसाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याची गरज निर्माण झाली आहे.

# गो तस्करी विरुद्ध पैठण पोलिसांची कारवाई; ६ लाखांचा मुद्देमाल जप्त

तभा वृत्तसेवा

पैठण दि २९ :- पर राज्यातल्या वाहनातून गोमातेची चोरी करून तस्करी करणाऱ्या वाहनाची शनिवारी पहाटे पैठण पोलिसांनी फिल्मी स्टाईल पाटला करून पकडले असून. तस्करी करण्यात येणाऱ्या पाच गोमातेची सुटका केली असून वाहनासह ६ लाख रुपयाचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.



अधिक माहिती अशी की शुक्रवारी दि.२७ रोजी रात्री पैठण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संजय देशमुख आपल्या पोलीस सहकार्यासह पेट्रोलिंग ग्रस्त घालीत असताना पहाटेच्या दरम्यान गोपनीय माहिती मिळाले की शेवगाव तालुक्यातील घोटण या गावातून पाच ते सहा अनोळखी चोरट्यांनी गोमातेची चोरी करून पर राज्यातील क्रमांक ठग३२त्रह्ह -३४५४ या वाहनातून पैठणकडे येत असल्याची माहिती मिळाल्याने तात्काळ पोलीस निरीक्षक संजय देशमुख, पो. कॉ कल्याण ढाकणे, नरेंद्र अंधारे, गायके, राजेश आटोळे यांनी शनिवारी पहाटेच्या सुमारास नवीन तहसील परिसरातून ही वाहन पळून जात असताना फिल्मे स्टाईल पाठलाग करून सदरील वाहनाला पकडले मात्र गोमातेची तस्करी करणारे पळून जाण्यात यशस्वी झाले. या वाहनाची झडती घेऊन यामध्ये असलेल्या पाच गोमातेची सुटका करून यामध्ये एक गोमाता आजारी असल्याने तात्काळ या गोमातेवर पोलीस ठाण्यात पशुवैद्यकीय पथकाकडून उपचार केला व इतर गोमातेला पैठण येथील विजय पांडुरंग गोशाळेत सुखरूप सोडण्यात आले. या घटनेत पाटेगाव येथील शेतकरी ज्ञानदेव बाबुराव डोंगरे यांच्या घरासमोरील पत्र्याच्या शेड मधून ८० हजार रुपये किमतीची गाय देखील या चोरट्यांनी चोरल्यामुळं पैठण पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून ६ लाख रुपयाचा मुद्देमाल हस्तगत केला. पुढील तपास उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. सिद्धेश्वर भोरे, पोलीस निरक्षक संजय देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली बीट जमादार लक्ष्मण पुरी हे करीत आहे.

# श्रीमती राजाबाई माधवलालजी धूत कन्या विद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

## शिवराज्याभिषेक व महाभारत व संत तुकाराम गाथेवरील नृत्य नाटिकांचे बहारदार सादरीकरण

तभा वृत्तसेवा

गंगापूर दि.२९ डिसेंबर : गंगापूर शहरातील श्रीमती राजाबाई माधवलालजी धूत कन्या प्रशाला व उच्च महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनामध्ये विद्यार्थिनींनी सादर केलेल्या शिवराज्याभिषेक व महाभारत व संत तुकाराम गाथेवरील नृत्य नाटिकांच्या बहारदार सादरीकरणाने उपस्थितांची वाहवा मिळवली.





शाळेच्या प्रांगणात झालेल्या या संमेलनाचे उदघाटन अध्यक्ष सुशिलकुमार मंत्री यांच्या हस्ते झाले यावेळी शालेय समितीचे सदस्य सौ. तृप्ती मंत्री, संतोष भालेराव, राजेंद्र सरोवर, रमेश पाटील प्राचार्या संजीवनी तांबे, विदुला शास्त्री यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी स्नेहसंमेलन दरम्यान घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांमध्ये यशस्वी झालेल्यांसह गतवर्षी दहावी, बारावी परीक्षांमध्ये सर्वप्रथम आलेल्यांचा बक्षिसे देउन गौरव करण्यात आला.

यावेळी इयत्ता पहिली ते बारावी पर्यंतच्या विद्यार्थिनींनी जुन्या नवीन गाण्यांवर आधारित रिमीक्स गीते, लावणी, देशभक्तीपर गीते, प्रबोधनात्मक गीतांसह ऐतिहासिक महाभारत, शिवराज्याभिषेक संत तुकाराम गाथेवर आधारित नृत्य नाटिका सादर करताना उत्कृष्ट अभिनय करून जिवंत इतिहास उपस्थितांसमोर उभा केल्याने प्रेक्षकांनी या सादरीकरणाला टाळ्यांच्या कडकडाटात दाद देत वाहवा केली.

याप्रसंगी स्नेहसंमेलनामध्ये घेण्यात आलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये शाळेतील साडेतीनशेवर विद्यार्थिनींनी प्रत्यक्ष सहभाग नोंदवला. त्यांना प्रतिसाद देण्यासाठी हजारावर पालक व मान्यवरांच्या उपस्थितीने शाळेचा परिसर फुलून गेला होता. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्रीमती अरूंधती जोसाळकर व अंजली मांडे, आभार प्रदर्शन अर्चना राउत यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शाळेतील शिक्षिकांसह कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# बिडकीन येथे फळ विक्रेत्याला तीन जणांकडून जबर मारहाण; गुन्हा दाखल

तभा वृत्तसेवा



बिडकीन दि २९ डिसेंबर पैठण तालुक्यातील बिडकीन येथील श्री स.भु विद्यालयाच्या समोर एका फळ विक्रेत्याला तिघा जणांकडून जबर मारहाण करून गंभीर जखमी करण्यात आले.

सविस्तर माहिती अशी की स.भु विद्यालय समोर फळ विक्रीची दुकान असून हुजेफ असिफ बागवान केळी हा नेहमी प्रमाणे सकाळी नऊ वाजेच्या सुमारस ग्राहक करीत होता केळी घेण्यासाठी आलेल्या ग्राहकांनी केळी दाबून पाहिली व भाव कमी जास्त करण्याच्या कारणावरून हुज्जत व बाचाबाची झाली. काही लोकांनी हा चालू असलेला वाद मिटवला त्यानंतर वाद गिरनार तांडा छत्रपती संभाजीनगर जाऊन परत वाद घालण्यासाठी तीन जण बुलेट या दुचाकीवर येऊन व फळ विक्रेत्याला लोखंडी मोज मापाने डोक्याला जबर मारल्याने रक्तबंबाळ होऊन मोठी दुखापत फळ विक्रेत्याला झाली.

नातेवाईक ,मित्रांनी मारहाणीत जखमी झालेल्या हुजेफला बिडकीन ग्रामीण रुग्णालय येथे दाखल करण्यात आले असता डॉक्टरांनी प्रथमोपचार करून छत्रपती संभाजी नगर शासकीय रुग्णालय येथे पुढील उपचारासाठी हलवले. या मारहाणीतील आरोपी राहुल जयसिंग चव्हाण (वय २४) राहणार गिरनेरा तांडा ता.जि. छत्रपती संभाजीनगर,व अमोल जयसिंग चव्हाण यास पोलिसांनी ताब्यात घेतले असून यातील एक फरार आरोपी यांच्या विरोधात बिडकीन पोलीस स्टेशन येथे रात्री उशिरा पर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू होती. जखमी हुजेफ बागवान यास शासकीय रुग्णालयातून उपचार करून सुट्टी देण्यात आल्यानंतर त्यास खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

# सोयगावात दत्त मंदिरात श्री.संत जगनाडे महाराज यांना अभिवादन

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२९ डिसेंबर

सोयगाव शहरातील दत्त मंदिरात शनिवारी श्री संत संताजी जगनाडे महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्ताने शनिवारी अभिवादन करण्यात आले यावेळी शिवसेना तालुका प्रमुख(शिंदे गट)प्रभाकर काळे,

सुरेश बनकर (उद्धव ठाकरे गट) यांनी प्रमुख उपस्थिती होती.ह.भ.प.जान्हवीताई सोनवणे यांनी मान्यवरांचे स्वागत केले तसेच अरूण सोहणी यांनी शाल श्री फळ देऊन सत्कार केला. शहरातील समस्त तिळवण तेली समाजाच्या वतीने या अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी नगरसेवक राजू दुतोंडे,कैलास काळे,सुनील गावंडे, मयूर मनगटे, नगरसेवक राजेंद्र जावळे,वसंत बनकर,नगरसेवक हर्षल काळे,नगरसेवक संतोष बोडखे, मोतीराम पंडित,अरुण सोहनी,मंगेश सोहनी,दिलीप मालोदे, संतोष सोनवणे,दत्तू सोनवणे,बंडू मिसाळ,शांताराम सन्सासे, कैलास पंडित,विनोद तेली,पिंटू सोहनी,सोनवणे,गणेश बागले,शिवाजी मालोदे,दत्तू राऊत,विक्रम सोहनी,गणेश क्षिरसागर,संदीप सोहनी आदींची उपस्थिती होती.



# रा.प.नाशिक ते छत्रपती संभाजीनगर बसेस गंगापूर बस स्थानकात येत नसल्याने प्रवाशांना मनस्ताप; आ. प्रशांत बंब यांचे विभागीय नियंत्रकांना पत्राद्वारे मागणी

तभा वृत्तसेवा

गंगापूर दि.२९ डिसेंबर:

नाशिक, छत्रपती संभाजी नगर राज्य परिवहन महामंडळाच्या बसेस गंगापूर बस स्थानकात येत नसल्याने या बसेस छत्रपती शिवाजी महाराज चौकातूनच परस्पर मार्गस्थ होत आहेत बस स्थानकातील प्रवाशांना तासनतास बसची वाट पाहत उभे राहावे लागत आहे. त्यामुळे अनेक प्रवाशांना वेळेनुसार बस न मिळाल्याने अनेकांच्या कामांचे नियोजन बिघडत आहे. वेळेवर बस न मिळाल्याने पोहचण्यासाठी विलंब होत आहे. यासंबंधी गंगापूर खुलताबाद तालुक्याचे आमदार प्रशांत बंब यांनी विभागीय नियंत्रक छत्रपती संभाजीनगर यांना पत्र देऊन सदरील बस या गंगापूर बस स्थानक येथे येणे अनिवार्य असून प्रवाशांची होणारी गैरसोय तात्काळ थांबविण्यात यावी. तर काही प्रवाशांना छत्रपती शिवाजी महाराज येथेच बसमधून उतरावे लागत आहे त्यामुळे त्यांना पुन्हा पायपीट करत बस स्थानक जावे लागत आहे.

**छत्रपती संभाजी नगर व नाशिक परिवहन मंडळाच्या बसेस या गंगापूर बस स्थानकात येत नसून वाहक आणि चालक यांना पत्र देऊन सक्ती करण्यात यावी तसेच छत्रपती शिवाजी महाराज चौकात कायमस्वरूपी वाहतूक नियंत्रकाची नेमणूक करण्यात यावी. या मागणीचे पत्र विभागीय नियंत्रक यांना दिले आहे.**

**- आ. प्रशांत बंब.**

छत्रपती संभाजीनगर ते नाशिक व नाशिक ते छत्रपती संभाजीनगर कडे जाणाऱ्या या दोन्ही विभागाच्या राज्य परिवहन महामंडळाच्या बसेस गंगापूर बस स्थानकात येजा करत नसून त्या छत्रपती शिवाजी महाराज चौकातूनच निघून जात आहे परंतु या बसेसच्या मार्गाने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना बस स्थानकातच ताटकळत उभे राहावे लागत आहे. त्या मार्गावरून जाणाऱ्या बसेसच्या वाहक आणि चालक यांना पत्र काढून सर्व बस गाड्या गंगापूर आगारात येण्याचे सक्तीचे करण्यात यावे. तसेच छत्रपती शिवाजी महाराज चौकात कायमस्वरूपी वाहतूक नियंत्रक यांची नियुक्ती करण्यात यावी अशी मागणी आमदार प्रशांत बंब यांनी केली आहे.

# राज्यासाठी समृद्धी घेऊन येणार टोयोटा : किर्लोस्कर मोटर्स

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकारातून 20 हजार कोटीची छत्रपती संभाजी नगर मध्ये गुंतवणूक

**टोयोटा किर्लोस्कर मोटर्स काय घेऊन येणार छत्रपती संभाजीनगर मध्ये राज्याच्या मागणीनुसार काय काय उभारण्यात येणार हे प्रत्यक्ष ठरवण्यात येणार असले तरी कर्नाटकच्या धरतीवर उभारण्यात आलेल्या प्रकल्पाप्रमाणे छत्रपती संभाजीनगर मध्ये ही प्रकल्प उभारण्यात येणार आहे.**

छत्रपती संभाजीनगर- राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुढाकार घेत जपान येथे जाऊन कर्नाटकच्या धरतीवरील प्रकल्पा सारखा प्रकल्प महाराष्ट्रातही घेऊन यावा अशी टोयोटा किर्लोस्कर मोटर्स कडे मागणी केली. त्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत पाहणी करून ऑरिक सिटीतील बिडकीन एमआयडीसी मध्ये येण्यास हिरवा कंदील दाखवला. आता २०२८ -२९ मध्ये उत्पादनाला सुरुवात होणार आहे. टोयोटा किर्लोस्कर मोटरच्या येण्याने मराठवाड्यात समृद्धी येणार हे मात्र निश्चित आहे.


उद्योग वार्ता
नारायण गायकवाड


टोयोटा किर्लोस्कर मोटर्स आणि महाराष्ट्र सरकार यांच्यात ३१ जुलै २०२४ रोजी वीस हजार कोटी रुपयाची गुंतवणूक करारावर स्वाक्षरी करत ८२७ एकर जमीन महाराष्ट्र राज्य कंपनीला देत असल्याचे तत्कालीन उपमुख्यमंत्री तथा सध्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केले होते. त्यानुसार ऑक्टोबर २०२४ मध्ये झालेल्या कराराप्रमाणे टोयोटा किर्लोस्कर मोटर्स ने ८२७ एकर जमिनीचे रक्कम अळल कडे जमा करण्यात आली आहे.

आता कंपनीने राज्यात येण्याच्या हालचालींना वाढ केली आहे त्याप्रमाणे वीस हजार कोटी रुपये ग्रीन फील्ड मॅन्युफॅक्चरिंग सुविधा असलेला प्रकल्प उभारण्यासाठी छत्रपती संभाजीनगर येथील ऑरीक (औरंगाबाद इंडस्ट्रियल सिटी) बिडकीन झोनमध्ये राज्यातील सर्वात मोठा चार चाकी इलेक्ट्रिक वाहन निर्माण करणारा प्रकल्प उभारणार आहे. राज्यासह मराठवाड्याच्या अर्थकारणाला या प्रकल्पाचा फार मोठा फायदा होणार असून कंपनीच्या प्रत्येक घडामोडीवर उद्योग जगताचे लक्ष लागलेले आहे.

**२०२८-२९ पर्यंत उत्पादन होणार सुरू**

प्लांट उभारणीच्या कामाची सुरुवात लवकरच प्रेरण्यात येणार असून २०१८ २९ पर्यंत उत्पादन सुरू होऊ शकते असे टोयोटा किर्लोस्कर मोटर्सचे कंट्री हेड आणि कार्यकारी उपाध्यक्ष विक्रम गुलाटी यांनी बेंगळूर येथे दृकश्राव्य माध्यमातून तरुण भारत शी बोलताना सांगितले. यावेळी ढघच् चे कार्यकारी उपाध्यक्ष, वित्त आणि प्रशासन जे शंकरा, एस व्ही पी आणि मुख्य संपर्क अधिकारी सुदीप दळवी, महा व्यवस्थापक परराष्ट्रीय व्यवहार आणि जनसंपर्क अधिकारी नरेंदर कुक्रेती आदी उपस्थित होते.







### सी एस आर फंडातून आरोग्य व सामाजिक उपक्रमाला गती मिळणार

कर्नाटक राज्यातील रामनगर येथे सी एस आर फंडातून टोयोटा किर्लोस्कर मोटार ने बारा कोटी रुपये खर्च करून शासकीय रुग्णालयाला इमारत बांधून दिलेली आहे त्यातील स्वच्छता व शिस्त आपल्याकडील खाजगी रुग्णालया याप्रमाणे जाणवली आहे. कंपनीतर्फे कोविड काळात येथेच पाच कोटी रुपये खर्च करून एक ऑक्सिजन प्लांट उभारण्यात आला . या प्लांट मधून तयार होणाऱ्या ऑक्सिजन कोविड काळात मोफत वितरित करण्यात आल्याचे सांगण्यात आले. एकंदरीत टोयोटा किर्लोस्कर मोटार च सामाजिक शैक्षणिक आणि आरोग्य विषयक कार्य पाहता राज्याचा आर्थिक जडणघडणीत मोलाचा वाटा असणार आहे व राज्याला समृद्धी लाभणार आहे.





### छत्रपती संभाजी नगर मध्ये इकोझोन

टोयोटा किर्लोस्कर मोटर शहरात येण्याच्या कंपनीने कर्नाटक राज्यात चार हजार एकशे कोटी रुपये याचे गुंतवणूक करून वायु प्रदूषण त्याचबरोबर पाणी प्रदूषण कमी करण्याचे उद्देशाने गुंतवणूक केली आहे. यामध्ये इको गार्डन आणि सोलार प्लांट उभारण्यात आला असून कंपनीसाठी लागणारे वीज याच प्लांट मधून वापरण्यात येते. आता कंपनी आपल्याकडे येण्याच्या हालचाली वाढल्या आहेत . कर्नाटक मधील प्रकल्पाप्रमाणे पर्यावरणास 'कार्बनमुक्त प्रोजेक्ट' कंपनीतर्फे आपल्याकडेही राबवण्यात येणार असून इको गार्डन आणि सोलर प्लांट आपल्याकडेही उभारण्यात येईल हेही स्पष्ट झाले आहे. या सोलर प्लांट मधून आपल्याकडेही संपूर्ण वीज वापरली जाईल असेच चित्र दिसत आहे.

### तांत्रिक प्रशिक्षणाद्वारे कंपनीच तयार करणार कारागीर

बिडकीन एमआयडीसीमध्ये उभारण्यात येणाऱ्या प्रकल्पात ८००० लोकांच्या हाताला काम मिळणार आहे. यामध्ये स्थानिक लोकांनाच प्राधान्य असणार असून आवश्यक कुशल कामगार कंपनीच घडवणार आहे यासाठी कर्नाटकच्या धरतीवर(ढ्ढढ्ढख) टोयोटा टेक्निकल ट्रेनिंग इन्स्टिट्यूट भरण्यात येणार असून याद्वारे शिका आणि कमवा या तत्त्वावर आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या कुटुंबातील विद्यार्थ्यांना दोन आणि तीन वर्षाचे निवासी प्रशिक्षण देत त्यांना सक्षम करण्यात येणार आहे. सध्या टोयोट किर्लोस्कर मोटर्स कर्नाटक येथील बिदाडी एमआयडीसी मध्ये TTTI अंतर्गत तेथील विद्यार्थ्यांना निवासी प्रशिक्षण देत आहे.

संपादकीय

तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# नव्या इतिहासाची नांदी...

## रोखठोक

**दिनेश गुणे**

इतिहासाची पुनरावृत्ती होते असे म्हणतात. पण तसे नेहमीच होत नाही. काही इतिहास एकदाच लिहिले जातात आणि अल्पकाळानंतर ते इतिहासाच्या पानावरून पुसलेदेखील जातात. तरीही, पुनरावृत्तीच्या कल्पनेवर मात्र या इतिहासाची श्रद्धा असते. विशेषतः, राजकारणाच्या क्षेत्रात इतिहासाच्या पुनरावृत्तीच्या आशेवर अनेकजण आपल्या भविष्याकडे डोळे लावून बसलेले असले, तरी सगळ्यांच्याच भूतकाळात घडून गेलेली कोणतीही गोष्ट एकदा पुसली गेली की भविष्यात उमटत नाही. म्हणूनच, शिवसेनेतील फुटीच्या इतिहासाची पुनरावृत्ती झाली, तरी शिवसेनेचे मुख्यमंत्री म्हणून उद्धव ठाकरे यांनी महाराष्ट्राचे नेतृत्व केले त्या इतिहासाची पाने फुटीनंतर पुसली गेली असल्याने त्याची पुनरावृत्ती होण्याची शक्यता मात्र पुसली गेली आहे. आता तो घटनाक्रम हाच इतिहास झाला आहे. या इतिहासाची पुनरावृत्ती होईल आणि पुन्हा एकदा उद्धव ठाकरे मुख्यमंत्री होतील असे त्यांच्या काही समर्थकांना वाटत होते, तो काळही आता इतिहासजमा झाल्याने, तसे काही वाटण्याच्या इतिहासाची पुनरावृत्तीदेखील संभवत नाही हे त्यांना कळून चुकले आहे. शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडली हा इतिहास झाला. आता त्याची पुनरावृत्ती होण्याची शक्यता नसली तरी शरद पवार पुन्हा एकदा सत्तावर्तुळाच्या केंद्रस्थानी येतील या आशेच्या इतिहासाची शक्यतादेखील मावळलीच आहे. अशा तऱ्हेने ठाकरे आणि पवार यांच्या राजकीय इतिहासाची पाने इतिहासजमा होऊ लागल्याने त्याच्या पुनरावृत्तीचा प्रश्नच मिटलेला असून, भारतीय जनता पार्टीचे नेते देवेंद्र फडणवीस यांना मात्र इतिहासाच्या पुनरावृत्तीचा प्रत्यय आल्याने, हा सिद्धांत राजकारणात नेहमीच खरा ठरत नाही या समजुतीवरच शिक्कामोर्तब झाले आहे. 'मी पुन्हा येईन' या त्यांच्या वाक्यात इतिहासाच्या पुनरावृत्तीचाच विश्वास होता आणि नवा इतिहास घडविण्याची जिद्ददेखील होती. त्या विश्वासाच्या बळावर त्यांनी इतिहास घडविण्याचे ध्येय उराशी बाळगले व ते सार्थदेखील करून दाखविले. अन्यथा, 'करून दाखविले' वगैरे काही वाक्ये केवळ घोषणांपुरतीच राहिल्याने, त्या वाक्यावरचा लोकांचा विश्वासदेखील संपतच चालला होता. तसे नसते, तर केवळ या एका घोषणेच्या बळावर इतिहासाची पुनरावृत्ती करून दाखविण्याची किमया अनेकांना साधली असती. तसे झाले नाही, यावरूनच, नेहमीच इतिहास पुनरावृत्तीसाठी तयार असतो असे नाही हे सिद्ध होते. आता देवेंद्र फडणवीस पुन्हा मुख्यमंत्री झाले आहेत आणि त्यांनी नव्याने काही करून दाखविण्याची तयारीही सुरू केली आहे. सत्तेची सूत्रे हाती घेताच त्यांनी केलेली एक घोषणा केवळ कागदावर राहणार नसून त्यानुसार काही करून दाखविण्याची आणि नवा इतिहास घडविण्याची त्यांची इच्छाशक्ती आता उघड होऊ लागली आहे. 'महाराष्ट्र आता थांबणार नाही', असे त्यांनी सत्ता हाती घेताच जाहीर केले होते. आता महाराष्ट्राची वाटचाल सुरू झाली आहे. नव्या महाराष्ट्रासाठी देवेंद्र फडणवीस यांच्या नव्या टीमचे काम सुरू झाले आहे आणि नव्या सत्ताकाळातील पहिल्या शंभर दिवसांत करावयाच्या कामांच्या पूर्वतयारीने वेग घेतला आहे.

गेल्या पाच वर्षांचा काळ हा महाराष्ट्राच्या संक्रमणाचा काळ होता. या काळात असंख्य आरोप, प्रत्यारोपांची राळ उडाली होती. महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीने असा काळ याआधी अनुभवला नव्हता. २०१९ ते २०२४ या काळात देवेंद्र फडणवीस या व्यक्तीस आणि त्यांच्या कुटुंबास ज्या प्रकारे लक्ष्य करण्यात आले, तसे याआधी कधीच घडले नव्हते. असे आरोप करणाऱ्या सर्वांचे नव्या सरकारच्या स्थापनेनंतर नागपुरात झालेल्या पहिल्या विधिमंडळ अधिवेशनात आभार मानून देवेंद्र फडणवीस यांनी कामाला सुरुवात केली आहे. फडणवीस यांना सातत्याने लक्ष्य करून त्यांनी बिघडविलेल्या वातावरणामुळे महाराष्ट्राच्या जनतेमध्ये सहानुभूती निर्माण झाली. याआधीच्या काळात महाराष्ट्रासाठी आणि राज्याच्या जनतेच्या हितासाठी जे काम फडणवीस सरकारने केले होते, त्याची पोचपावती या निवडणुकीतून जनतेने दिली. ज्यांनी निवडणुकीच्या राजकारणातून सामाजिक ध्रुवीकरण करण्याचा प्रयत्न केला, त्यांना जनतेने झिडकारले. जवळपास पन्नास टक्के मतदारांनी महायुतीला पसंतीची पावती दिली. महाराष्ट्राच्या निवडणुकीच्या इतिहासात हे पान नव्याने लिहिले गेले आहे. असा भरघोस जनाधार याआधी कोणत्याच राजकीय पक्षाला, आघाडीला मिळाला नव्हता. नव्याने लिहिल्या गेलेल्या या इतिहासाची पुनरावृत्ती झालीच, तरी फडणवीस यांच्यावर व्यक्तिगत आरोपाची, टीकेची आणि असभ्य कुचेष्टेची राळ उठविणाऱ्यांना त्याचा फायदा मिळणार नाही याची खबरदारी इतिहासच घेईल, हे



आता हळूहळू स्पष्ट होऊ लागले आहे. म्हणूनच, निवडणुकी आधीच्या काळात महाराष्ट्राचे वातावरण गढूळ करण्यात पुढाकार घेणाऱ्यांचा सूर आता मवाळ होताना दिसत आहे. अधिवेशनकाळात शिवसेनेच्या ठाकरे गटाच्या आमदारांनी उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली एकत्रितपणे जाऊन फडणवीस यांची भेट घेतली, त्यांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन केले, त्यांच्या नेतृत्वावर जनतेने उमटविलेली मान्यतेची मोहर स्वीकारली, याचा हा पुरावा आहे. त्या भेटीत नेमके काय घडले ते स्पष्ट झालेले नाही. पण, उद्धव ठाकरे यांनी याआधी फडणवीस यांच्यावर केलेल्या आरोपांचा, टीकेचा आणि टोमण्यांचा पश्चात्ताप त्यांना झाला असावा, असे त्या भेटीनंतरच्या काही बातम्यांवरून स्पष्ट झाले. कदाचित त्या भेटीदरम्यानच्या त्यांच्या चेहऱ्यावर उमटलेले भाव वाचून तशा बातम्यांचा जन्म झाला असावा. त्यामुळे आता फडणवीस यांच्यावरील आरोप, टीका आणि टोमणे हा इतिहास झाला आहे आणि त्याची पुनरावृत्ती होणार नाही, यावर एकतर्फी शिक्कामोर्तबही झाले आहे.

याच निवडणुकीच्या निकालनंतर आणखी एका मुद्याने नेहमीप्रमाणे पुन्हा एकदा उचल खाल्ली होती. जेव्हा जेव्हा भाजपा आघाडीच्या विरोधातील आघाड्यांना निवडणुकीत पराभव पाहावा लागला, तेव्हा तेव्हा मतदान यंत्रांच्या नावाने खडे फोडणे हा गेल्या दहा वर्षांतील निवडणुकोत्तर काळाचा इतिहास झाला आहे. त्याच इतिहासाची निकालानंतर पुनरावृत्ती झालेली महाराष्ट्रात पाहावयास मिळाली. ईव्हीएमच्या कार्यशैलीवर निराधार प्रश्नचिन्हे उमटवून संशयाचे वादळ निर्माण करण्याचा प्रयत्न विरोधकांनी करून पाहिला. शरद पवार यांनी उमटविलेल्या प्रश्नचिन्हावर सावधगिरीचा मुलामा होता, तर ठाकरे गटाने आक्रमकपणे प्रश्नचिन्हे उमटविण्याचा प्रयत्न केला. काँग्रेसने तर या निकालाचे भांडवल करून पराभवाचे संपूर्ण खापर ईव्हीएमच्या माथ्यावर मारण्याची जोरदार कसरत केली. याआधीही, अनेक निवडणुकांत हेच झाले होते. देशातील ज्या ज्या राज्यांतील वेगवेगळ्या निवडणुकांत भाजपाविरोधी पक्षांना पराभव चाखावा लागला, त्या त्या राज्यांत ईव्हीएमवर शंका उपस्थित करावयाचे तंत्र या वेळी काँग्रेसने महाराष्ट्रातही वापरले आणि ठाकरे-पवार यांच्या युतीने त्यास पाठिंबा देत शंकेचे सूर आळविले. आता मात्र, तो सूरही मवाळ झाला आहे. पवार यांच्या गटाने ईव्हीएमच्या वादावर पडदा टाकण्याची तयारी सुरू केली आहे. शरद पवार यांच्या कन्येने, खासदार सुप्रिया सुळे यांनी ईव्हीएमला एक प्रकारे क्लीन चिट दिल्याने पवार गटातून आता या वादाच्या इतिहासाची पुनरावृत्ती होणार नाही, याची खबरदारी घेतली जाईल, अशी चिन्हे आहेत. याच ईव्हीएमद्वारे घेतल्या गेलेल्या निवडणुकीत मी चार वेळा विजयी झाले असल्याने व ईव्हीएमच्या कार्यशैलीवर शंका घेण्याएवढे कोणतेही ठोस पुरावे हाती नसल्याने, या निवडणूक प्रक्रियेवर शंका घेणे योग्य नाही, असा सूर सुप्रिया सुळे यांनी लावला आणि विरोधकांच्या आक्रमक पवित्र्यातील हवाच निघून गेली. विरोधकांच्या आरोपास उत्तर देताना महाविकास आघाडीचे नेतेदेखील याच मुद्यावर भर देत होते. जेव्हा विजय होतो, तेव्हा ईव्हीएमविरोधात तक्रार नसते आणि पराभव होताच ओरड सुरू होते, हा कांगावा टिकणार नाही, हे दिसू लागले. साहजिकच, महाविकास आघाडीतील ईव्हीएमविरोधी सूर आता मावळत चालल्याने ठाकरे गटाच्या ईव्हीएमविरोधी आवाजातील हवादेखील निघून जाईल. इतिहासाची अल्पकाळ झालेली एक पुनरावृत्ती आता पुसली गेली आहे आणि ईव्हीएमच्या नावाने वादळ निर्माण करून फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुतीला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्याचे प्रयत्न पुरते फसले आहेत. एका वादळाचे ढग विरल्याने, महाराष्ट्राच्या वाटचालीतील पुढच्या पावलांचा प्रकाश स्वच्छ झाला आहे.

विधिमंडळाच्या पहिल्या अधिवेशनातील आपल्या पहिल्याच भाषणात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्रातील १४ कोटी जनतेचे आभार मानले. महायुतीला घवघवीत यश देऊन २३७ आमदार सत्तापक्षाच्या बाजूने निवडून आणले आणि महायुतीच्या घटक पक्षांनी एकत्रितपणे केलेल्या कामास विजयाचे श्रेय बहाल केले. गेल्या पाच वर्षांत विरोधकांनी फडणवीस यांना चक्रव्यूहात फसविण्याचे अनेक प्रयत्न केले. पण असे चक्रव्यूह भेदण्याची कला आपल्याला अवगत आहे आणि त्यातून बाहेर पडण्याचा मार्गदेखील आपणास माहीत आहे, असे देवेंद्र फडणवीस यांनी पाच वर्षांपूर्वी एका वृत्तवाहिनीवरील मुलाखतीत म्हटले होते. 'मी पुन्हा येईन' या त्यांच्या विश्वासाची तेव्हा खिल्ली उडविणाऱ्यांनी त्याच काळात फडणवीस यांचे ते वक्तव्यदेखील फार गांभीर्याने घेतले नव्हते. त्यामुळे, इतिहासाची पुनरावृत्ती होईल असे त्यांना वाटलेदेखील नव्हते. आता फडणवीस यांनी पुन्हा मुख्यमंत्रिपदाची सूत्रे हाती घेतली आणि आपण आधुनिक अभिमन्यू आहोत हे सिद्ध केले. एक प्रकारे इतिहासाचीच नव्हे, तर पुराणाचीही पुनरावृत्ती इथे झालेली दिसते. इतिहासाच्या पुनरावृत्तीच्या इतिहासातही असे क्वचितच घडलेले दिसते. अर्थात, या यशाचे श्रेय फडणवीस यांनी पक्षाला, सोबत काम करणाऱ्या सहकाऱ्यांना आणि राज्यातील जनतेला दिले. 'आंधियों में भी, जो जलता हुआ मिल जायेगा, वो दिये से पूछना, मेरा पता मिल जायेगा' हे त्यांचे उद्गार, भविष्यातही इतिहासाची पुनरावृत्ती करण्याच्या आत्मविश्वासाची साक्ष देणारे ठरले आहेत. म्हणूनच, महाराष्ट्र आता थांबणार नाही, या त्यांच्या घोषणेची आता खिल्ली न उडविता, महाराष्ट्राच्या नव्या वाटचालीत साथ देण्यासाठी तयारी करण्याचा मोठेपणा विरोधकांना दाखवावा लागेल. विधानसभा निवडणुका जिंकण्याकरिता विरोधकांनी केलेल्या राजकारणाची सभागृहातच सडेतोड चिरफाड करून फडणवीस यांनी विरोधकांच्या राजकीय संस्कृतीला आरसा दाखविला आहे. नव्या वाटचालीत ही संस्कृती बासनात बांधून राज्याच्या हितासाठी सरकारसोबत काम करण्यातच हित आहे, हे विरोधकांनी ओळखले, तर संस्कृतीच्या इतिहासाची पुनरावृत्ती होईल. महाराष्ट्रात महायुती सरकारने दिलेले प्रत्येक आश्वासन पूर्ण केले जाईल, ज्या कल्याणकारी योजना सुरू केल्या आहेत, त्यापैकी एकही योजना बंद होणार नाही आणि योजनेच्या अंमलबजावणीतील त्रुटी दूर केल्या जातील अशी ग्वाही देऊन फडणवीस सरकारने नव्या महाराष्ट्राच्या नव्या वाटचालीची दिशा स्पष्ट केली आहे. विरोधकांनी नव्याने सुरू केलेली फेक नॅरेटिव्हची नवी फॅक्टरी उद्ध्वस्त करण्याचा निर्धार करून फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने नवी वाटचाल सुरू केली आहे. याच फॅक्टरीमधील मारकडवाडीचा डाव फडणवीस यांनी उघड केला. शरद पवार यांच्यासारख्या नेत्याने या काळात ईव्हीएमच्या सेटिंगवर प्रश्नचिन्हे उभी करण्याचा प्रयत्न केल्याबद्दल त्यांनी खंत व्यक्त केली. आता सुप्रिया सुळे यांनी समंजस भूमिका घेतल्याने, शंकेचे ढग विरले आहेत आणि ईव्हीएमचा वादही संपल्यात जमा आहे. आता महाराष्ट्र थांबणार नाही, या फडणवीस यांच्या विश्वासाची या नव्या वाटचालीला साथ लाभली आहे. जनतेने दिलेला कौल विरोधकांनी खुल्या मनाने स्वीकारला नसला, तरी आता नव्या महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी सुरू झालेली नव्या सरकारची वाटचाल निर्विघ्नपणे सुरू राहील आणि नवा इतिहास निर्माण होईल, असे वातावरण निर्माण होऊ लागले आहे. महाराष्ट्राच्या दुष्काळमुक्तीसाठी केलेल्या कामांना गती येणार आहे. गेल्या अडीच वर्षांत महायुती सरकारने राज्यातील १६७ प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता दिली, त्यामुळे २५.२१ लाख हेक्टर जमीन सिंचनाखाली आली आहे. हा नवा इतिहास आहे. गेल्या तीन-चार दशकांपासून राज्यात नदीजोड प्रकल्पांवर केवळ चर्चा होत होती. शाश्वत पाणीपुरवठ्याचा हा हमखास स्रोत असल्याची भूमिका दहा वर्षांपूर्वीच मांडली गेली होती. आंतरराज्य प्रकल्पांचा वाद त्या त्या राज्यांनी चर्चा करून सोडवावा व मार्ग काढावा असा केंद्र सरकारचा स्पष्ट निर्देश आहे. पण आंतरराज्य प्रकल्पांसाठी केंद्राच्या मदतीची गरजच नसल्याने कोणावरही अवलंबून न राहता असे प्रकल्प राज्यात राबविण्याचे धोरण राज्य सरकारने स्वीकारले आणि त्यानुसार महाराष्ट्रात पाच वर्षांपूर्वी पहिल्यांदा महाराष्ट्राचा जल आराखडा तयार करण्यात आला. गेल्या अडीच वर्षांत महायुती सरकारने राज्यातील चार प्रमुख नदीजोड प्रकल्पांना मान्यता दिली आणि त्याच्या निविदाही जारी झाल्या आहेत. राज्यात मेट्रो रेल्वेच्या कामांना वेग आला आहे. मुंबई महानगर क्षेत्रात सुमारे ३७४ किलोमीटरचे मेट्रो रेल्वेचे जाळे उभारण्याचा संकल्प राज्य सरकारने सोडला आहे, त्यापैकी सुमारे ९५ किलोमीटरचे जाळे कार्यान्वित होऊन मुंबईला नवी जीवनरेखा प्राप्त होणार आहे. पुणे, नागपूर मेट्रोच्या कामालाही गती मिळाली आहे, हादेखील एक नवा इतिहास आहे. 'समृद्धीचा वेग आता कुणी रोखणार नाही, महाराष्ट्र आता थांबणार नाही', असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला आहे. विधिमंडळात त्यांच्या या विश्वासाच्या सुरात सभागृहाचे सूर मिसळले, तेव्हाच नव्या इतिहासाची नांदी गायिली गेली आहे.

## रविवारची पत्रे

### बृहन्मुंबई महानगरपालिका निवडणूक उबाठासाठी अस्तित्वाची लढाई






राज्याच्या निवडणुकीत मिळालेल्या घवघवीत यशानंतर महायुतीचे लक्ष बृहन्मुंबई महानगरपालिका निवडणुकीवर आहे. विधानसभा निवडणुकीच्या दरम्यान आपल्या प्रत्येक भाषणात उद्धव ठाकरे खरी शिवसेना कोणाची याबाबत मला न्यायालयाकडून फारशी अपेक्षा नाही. शिवसेना कुणाची याचा निर्णय आता जनतेच्या न्यायालयातच होईल, असे वारंवार संबोधित करीत होते. त्यासाठी ते राज्यातील विधानसभेच्या निवडणुकीची आतुरतेने वाट पाहत होते. कारण या आधी पार पडलेल्या मुंबईतल्या लोकसभा निवडणुकीत सहा मतदार संघापैकी चार जागा महाविकास आघाडीला तर दोन जागा महायुतीला मिळालेल्या होत्या. त्यामुळे महाविकास आघाडीचा आत्मविश्वास चौथ्या अस्मानाला भिडला होता. त्यात ही शिवसेना उद्धव ठाकरेंची. या लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला महायुतीपेक्षा केवळ १.१८ टक्के अधिक मते मिळाली होती. पण आघाडीने ३० जागा जिंकल्या आणि युतीला १७ जागांवर समाधान मानावे लागले होते. महाविकास आघाडीला ४३.९१ तर महायुतीला ४२.७३ टक्के मिळाली होती. पण मुंबईचा फक्त विचार केला या ठिकाणी महाविकास आघाडीला या निवडणुकीत २ लाख मते महायुतीपेक्षा कमी पडली आहेत. २६ लाख महायुतीला, तर महाविकास आघाडीला २४ लाख मते पडली होती. ही कमी मते शिवसेना ठाकरेंच्या दृष्टीने धोक्याची घंटा होती.

पण नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीतील निकालाने राज्यातील जनतेने महाविकास आघाडीला पूर्णपणे नाकारले. या निवडणुकीत राज्यातील जनतेने दाखवून दिले की त्यांच्या मनातील खरी शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस कोणती आहे. त्याद्वारे शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या हिंदुत्वाचा विचारांचा खरा वारसा कोण प्रभावीपणे पुढे नेऊ शकतो. या विधानसभा निवडणुकीत शिवसेनेने ८१ जागांवर आपले उमेदवार उभे केलेत. त्यापैकी ५७ जागांवर विजयी झाले. १२.३८ टक्के मते शिवसेनेला मिळाली. तर त्यांना मिळालेल्या एकूण मतांची संख्या ७९ लाख ९६ हजार ९३० आहेत. उद्धव ठाकरे गटाला फक्त २० जागांवर विजय मिळवता आला आहे. ९.९६ टक्के मते त्यांना मिळाली आहेत. ६४ लाख ३३ हजार ०१३ इतकी एकूण मतं ठाकरे गटाला मिळाली आहेत. या निकालात शिवसेना उद्धव ठाकरेंपेक्षा वरचढ ठरली.

मागील २०१७ बृहन्मुंबई महानगरपालिका निवडणुकीत शिवसेनेला ८४, भाजपाला ८२ जागा मिळाल्यात. भाजपला शिवसेनेपेक्षा दोन जागा कमी मिळाल्यात. काँग्रेस पक्ष या निवडणुकीत तिसऱ्या स्थानावर राहिला असून ३१ जागा मिळाल्यात. तर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला ७ तर राष्ट्रवादीला ९ जागा मिळाल्यात.

या सगळ्या पृष्ठभूमीवर उद्धव ठाकरे पक्षाच्या दृष्टीने आज मुंबई महानगर पालिका महत्त्वाची आहे. त्या मागचे मुख्य कारण अर्थकारण सोबत पक्षाचा पाया. आज एकट्या मुंबई महानगर पालिकेचे बजेट हे उर्वरित महाराष्ट्र राज्याएवढे आहे. तसे मुंबई महानगरपालिका जिंकली तरच उर्वरित महाराष्ट्रात पक्ष कार्यान्वित राहील हे उद्धव ठाकरे ओळखून आहेत. आजच्या परिस्थितीत मुंबईतच उद्धव ठाकरे यांचा पक्ष महाविकास आघाडीतील इतर घटकांपेक्षा मजबूत स्थितीत असला तरी गेल्या पाच वर्षात शिवसेना उद्धव ठाकरे हे सत्तेसाठी किती कोल्यांट्या मारत आहेत याची गणती न केलेली बरी.

मुंबईतील विधानसभा जागांचा विचार केला तर यावेळी भाजपाने १७ पैकी १५, उद्धव ठाकरे गटाने २२ पैकी १०, तर शिवसेनेने १५ पैकी ६, तर काँग्रेसने १० पैकी ३, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाने २ पैकी शून्य, तर राष्ट्रवादी अजित पवार गटाने २ पैकी १ जागा जिंकल्या तर महाविकास आघाडीने १३, तर महायुतीने २२ जागा जिंकल्या आहेत. या विधानसभा निवडणुकीत आलेल्या अपयशानंतर उद्धव ठाकरे यांनी मुंबई महापालिकेवर मराठी माणसांचा, हिंदुत्वाचा झेंडा आहे तो उतरू नये, असे शिवसैनिकांना आवाहन केले आहे.

उद्धव ठाकरे पक्ष हा आतापर्यंत कायम कट्टर हिंदुत्ववादी विचारधारेचा पुरस्कर्ता असलेला पक्ष म्हणून ओळखला जात होता. मुस्लिम मतं शिवसेनेला कधीच मिळत नव्हती. पण उद्धव ठाकरे महाविकास आघाडीत आल्यामुळे लोकसभा, विधानसभा निवडणुकीत हा मुस्लिम मतदार उबाठाकडे वळला. याचा फायदा मुंबईत तसेच राज्यातील काही भागांत झाला.

विधानसभा निवडणुकीतील विजयानंतर भारतीय जनता पक्ष, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट यांच्या महायुतीचा वाढलेला आत्मविश्वास, याउलट महाविकास आघाडीतील अंतर्गत द्वंद्व यात बदललेली राजकीय परिस्थिती बृहन्मुंबई महानगरपालिका आपल्याकडे राखणे म्हणजे उद्धव ठाकरेंसाठी अस्तित्वाची लढाई आहे.

**अविनाश देशपांडे**/९२८४६७९६२३

●● ●●

### डिमेंशिया खरंच काळजीचा विषय

तरुण भारत आकांक्षा पुरवणीतील मंगला जोगळेकर, ज्या या विषयातील तज्ज्ञ आहे, यांचा या विषयावरचा अभ्यासपूर्ण लेख वाचला. डिमेंशिया किंवा विस्मरण हा आजार आता भयावह रूप धारण करतो आहे. आधी फक्त उतारवयात होणारा हा आजार तरुणांनाही होताना दिसत आहे. हा आजार बरा होणे कठीण आहे व तो वाढतच जातो हा फार भयंकार अनुभव आहे. सुरुवातीला होणाऱ्या विस्मरणाची लोक गंमत करतात पण ही सुरुवातच घातक असते हे लक्षात घ्या.

हा आजार होणारा व परिवार दोन्ही फार त्रस्त असतात कारण याला इलाज नाही व दिवसेंदिवस होणारी वाढ ही जीवावर पण बेतू शकते. कारण पुढे पुढे हे विस्मरण घातक सिद्ध होऊ शकते. नाव, पत्ता विसरणे यामुळे फार कठीण प्रसंग ओढवतात. ज्याचा परिवाराला फार मानसिक त्रास होतो.

समुपदेशन व योग्य मार्गदर्शन उपयोगी सिद्ध होते आहे. याकरिता समाजसेवी वृत्तीच्या समुपदेशक मंगला जोगळेकर, (दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटल, पुणे) निःस्वार्थपणे गेली पंधरा वर्षे मार्गदर्शन करत आहेत. त्यांच्या मंगल.जोगळेकर जीमेल.कॉम वर आपण संपर्क साधू शकता. तसेच रामनगर नागपूरचे विजय (राजू) दिवेकर यांच्याशी पण संपर्क करू शकता. आरोग्य भारतीचे? डॉ. रमेश गौतम यात पुढाकार घेणार आहेत. आपल्या परिवारातील, ओळखीतील कोणाला हा त्रास असेल तर जरूर संपर्क साधावा.

**रवी वाघमारे**/९९६००१८०३०

●● ●●

### भारताला चीनपासून सतर्क राहण्याची गरज


कझानमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारत युद्धाला नाही तर शांतता आणि संवादाला पाठिंबा देतो असे म्हटले होते. अलिकडेच रशियात झालेल्या 'ब्रिक्स'च्या परिषदेत त्यांनी दहशतवादाचा मुद्दा उपस्थित केला. या विषयावर दुटप्पी वृत्ती असता कामा नये, असे परखड मत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मांडले होते. आंतरराष्ट्रीय मंचावर भारत कायमच दहशतवादाच्या विरोधात भूमिका घेत आला आहे. तथापि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या रशिया दौऱ्यात सकारात्मक घटना घडली ती चीनसोबत झालेल्या द्विस्तरीय बैठकांची.

त्यातही भारताने अर्थात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शांतता आणि स्थैर्याचा मुद्दा मांडला. आणि चीननेही त्याला सकारात्मक प्रतिसाद दिला. भारत आणि चीन संबंधात पुन्हा काहीसा कथित स्नेह परतताना दिसतो आहे. अर्थात हे ब्रिक्सच्या काही तासांच्या अवधीत झाले नाही. पाकिस्तानला झालेल्या शांघाय सहकार्य संघटनेच्या परिषदेपासूनच त्याची सुरुवात झाली होती. चीनसमोर आज जगातील इतरही काही विषय आहेत. त्यामुळे चीनने भारताशी जुळवून घेण्याचा किंवा त्यांच्या स्वभावाच्या विपरीत नमते घेण्याचा प्रयत्न केला गेला. भारताने यावर गाफील राहून चालणार नाही. आणि चीनबरोबरचा तणाव हलका होण्याच्या दिशेने आपण मार्गस्थ झालो आहोत या संतुष्टीतही जाता कामा नये. गेल्या चार वर्षांपासून भारत आणि चीन यांच्यात तणाव सुरू होता. दरम्यानच्या काळात कोविडचा अवधी सोडला तरी विविध जागतिक मंचांवर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि चीनने राष्ट्रपती जिनपिंग यांच्या औपचारिक भेटी झाल्या. या भेटीत दोन्ही नेत्यांनी स्वतंत्र अशी चर्चा झाली नाही. ब्रिक्समध्ये रशियाच्या पडद्यामागच्या पुढाकाराने ही चर्चा केली गेली. उभय देशांच्या सर्वोच्च नेत्यांच्या भेटीच्या अवघे चोवीस तास अगोदर दोन्ही देशांत एक शांतता करारही झाला. त्यानुसार लडाखच्या पूर्व भागात दोन्ही देशांनी आपले सैन्य मागे घेण्याचे आणि प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर जुनी स्थिती पुन्हा बहाल करण्याचा निर्णय घेतला. आता दोन्ही देशांचे सैनिक आपापल्या हद्दीत सीमेवर गस्त घालतात. सीमावाद सोडवण्यासाठी आम्ही भारताला सहकार्य करू अशी ग्वाही चीनने दिली. करार आणि ब्रिक्सच्या दरम्यानची चर्चा यावरून ही बाब स्पष्ट होते की ताठर चीन आता लवचीक होण्याचा प्रयत्न करतो आहे. चीनला भारताशी अगदी पाकिस्तानप्रमाणे सर्व काळात किंवा सर्व ऋतूत बहरणारी मैत्री जरी नको असली तरी भारतासोबत आज त्यांना तणाव नको आहे. आपल्या सीमेवर तसेच आपल्या शेजारी देशांतील चीनच्या लुडबुडीकडेही अधिक लक्ष द्यावे लागणार आहे आणि सावधही राहावे लागणार आहे.

**प्रा. मधुकर चुटे**/ ९४२०५६६४०४

●● ●●

### ढकलगडी बंद करण्याचा स्वागतार्ह निर्णय



इयत्ता पाचवी आणि आठवीत नापास झालेल्या विद्यार्थ्यांना पुढील वर्गात प्रवेश न देता त्याच वर्गात ठेवण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. महाराष्ट्र सरकारने हा निर्णय गेल्याच वर्षी घेतला आहे. आता केंद्र सरकारने हा निर्णय घेतल्याने तो संपूर्ण देशासाठी लागू झाला आहे. केंद्र सरकारने घेतलेला हा निर्णय स्वागतार्ह आहे. पालक, शिक्षक आणि समाजातून या निर्णयाचे स्वागतच होत आहे कारण असा निर्णय घ्यावा अशी मागणी मागील अनेक वर्षांपासून होत होती. शिक्षण हक्क कायद्यानुसार विद्यार्थ्यांचे सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन होत होते. त्यात विद्यार्थ्यांची परीक्षाही होत असे मात्र नापास होणारच नाही याची खात्री असल्याने विद्यार्थी परीक्षेसंदर्भातील म्हणावे तितके गंभीर नसत. पासच होणार असल्याने काही मुले अभ्यासाकडे दुर्लक्ष करीत असे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या अध्ययन क्षमतेत घसरण होऊ लागली होती. विद्यार्थ्यांच्या अध्ययन क्षमतेत घसरण होऊ लागल्याने शिक्षणाच्या दर्जावरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. आता सरकारने हा निर्णय घेतल्याने नापास होण्याच्या भीतीने तरी विद्यार्थी नियमित अभ्यास करतील. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या अध्ययन पातळीत वाढ होऊन शिक्षणाचा दर्जा उंचावेल.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

●● ●●

### धर्म-संस्कृती -श्रद्धा

२०२५ या इंग्रजी नवीन वर्षाच्या कालगणनेनुसार काही प्रख्यात मंदिरे भक्तांच्या सोयीसाठी ३१ डिसेंबर २०२४ संपूर्ण रात्र दर्शनासाठी उघडी राहातील. त्यामुळे रात्रीची शेजारती व ०१ जानेवारीच्या पहाटेची काकड आरती होणार नाही अशी बातमी सातत्याने दूरदर्शन वाहिनीवर बघायला मिळते आहे. याचा अर्थ भक्तांच्या आशेवर परमेश्वराचे अधिष्ठान असते का? की ईश्वरकृपेमुळे जगाचे रहाटगाडगे चालते? याचे भान कोणालाच राहिलेले दिसत नाही . अखंड रात्रभर दर्शन हे तात्पुरते मान्य केले तरी भगवंताच्या अर्चेनेमध्ये खंड का पडला जातो? त्यामुळेच धर्म -संस्कृती आणि श्रद्धा या गोष्टींना तडा जातो आहे याकडे कोणी लक्ष देतील का? आणि देवाला रात्रीच्या १२ वाजता दुसरा दिवस अभिप्रेत आहे का? आणि असे असेल तर धर्मशास्त्राप्रमाणे हिंदू पंचांगांना तिलांजली दिली असा समज होणे चुकीचे ठरणार नाही . चैत्र पाडव्याच्या प्रथम दिवशी अशी मंदिरे दर्शनासाठी उघडी नसतात याचे भान मंदिरातील धर्मशास्त्र पंडितांनी आणि सरकारने ठेवणे गरजेचे वाटते. केवळ मंदिराचे उत्पन्न वाढावे हाच मुख्य हेतू समोर येतो आहे. हिंदुत्व आणि हिंदू समाज यामुळे अन्य धर्मीयांपेक्षा अंध होतो आहोत.

**अमोल करकरे**/९९६७९२७६१७

●● ●●

### हिंदू समाजाचे संघटन हे एक व्रत


आपला भारत हा देवनिर्मित आहे. अनादी काळापासून हिमालय याची साक्ष आहे. गंगा, यमुना व सरस्वती या नद्या पण हेच सांगत आल्या आहेत. इथेच श्रीराम, लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न, सीतादेवी अवतरल्या. भगवान श्रीकृष्ण, राधा, गोपी अवतरल्या. कारण हा देश देवनिर्मित आहे. आपला परमेश्वरावर विश्वास, देशावर प्रेम म्हणूनच आपण या भारत भूमीत हिंदू समाजात जन्माला आलो. भगवद्गीतेत तर श्रीकृष्णाने स्पष्टच सांगितलेले आहे, ''साधूचे संरक्षण, दुष्टांचा नाश आणि धर्माची स्थापना करण्यासाठी मी युगे युगे जन्म घेतो.'' आणि म्हणून १८८९ साली डॉ. हेडगेवार यांचा जन्म झाला. पुन्हा भारत हिंदू समाज याचे संरक्षण करून हिंदू समाजाचे विशाल संघटन डॉ. हेडगेवार यांच्याकडून झाले. डॉ. हेडगेवार हे आध्यात्मिक वृत्तीचे होतेच पण प्रखर देशभक्तही होते. हिंदू राष्ट्राला बलवान करण्यासाठी हिंदू संघटित असला पाहिजे हे त्यांनी हेरले होते व तसे सिद्धही केले. म्हणून आपला समाज संघटित व्हावा असा प्रयत्न आपण सर्वांनी करायला हवा.

**मधुकर अमृत डबीर**/९८२२६१५३३१

●● ●●

### समृद्धी महामार्गावर अडथळे

समृद्धी मार्गावर अलिकडे अपघातांचे प्रमाण कमी झाले आहे. मात्र या महामार्गावर अनेक नादुरुत वाहने २-४ दिवस जागेवरच थांबलेली दिसतात. या महामार्गावर पाळीव प्राणी किंवा जनावरे असू नये, पण या महामार्गाच्या लगत गाई, म्हशी, शेळ्या चरताना दिसतात. ही जनावरे आपात्कालीन मोकळ्या



जागेत केव्हाही येऊन मोठा अपघात होऊ शकतो. कुत्र्यांचाही मुक्त संचार या मार्गावर सर्रास असतो. जर अपघातात एखादे कुत्रे आले तर ते मृतावस्थेत कित्येक दिवस तेथेच पडलेले असते. रानटी प्राणी विशेषतः हरणांचा कळपही या मार्गावर येतो. कारण या महामार्गाच्या बाजूला जे सिमेंट कंपाऊंड आहे, त्यांचे अनेक पत्रे काढून शेजारी राहणाऱ्या नागरिकांनी गाई, म्हशी व शेळ्या चारण्यासाठी मार्ग काढला आहे.

या सर्व बाबी मोठ्या किंवा छोट्या अपघातांना कारणीभूत ठरतात. त्यामुळे या महामार्गाच्या सुरक्षेच्या दृष्टीने सर्व बाबतीत सतर्कता बाळगून हे अडथळे दूर करण्यासाठी सर्वंकष प्रयत्न व्हावेत अशी अपेक्षा आहे.

**धोंडीरामसिंह राजपूत**/९४२१३१२२४४

●● ●●

### जड झाले ओझे




गेल्या काही वर्षांत विमान प्रवास करणाऱ्यांची संख्या प्रचंड वाढलेली आहे. देशांतर्गत विमान प्रवास करताना आपल्यासमोर इंडिगो, एअर इंडिया आणि क्वचित इतर विमान कंपन्यांचे पर्याय उपलब्ध असतात. तिकिटांचे दर आणि वेळापत्रक बघता इंडिगोची निवड केली जाते. इंडिगोच्या देशांतर्गत विमान प्रवासासाठी प्रत्येकी पंधरा किलोपेक्षा कमी वजनाची एक चेक-इन बॅग आणि सात किलोपेक्षा कमी वजनाची एक हॅण्ड बॅग अशी परवानगी आहे. चेक-इन होणाऱ्या सामानाचे वजन पंधरा किलोपेक्षा जास्त असल्यास अतिरिक्त पैसे घेतले जातात. पण हॅण्ड बॅगच्या बाबतीत ना वजन केले जाते ना त्यांची संख्या बघितली जाते. अनेक प्रवासी एकपेक्षा जास्त हॅण्ड बॅग्स, सात किलोपेक्षा जास्त वजनाच्या आणि अवाढव्य आकाराच्या बिनदिक्कत घेऊन जात आहेत. विमानात चढताना आणि उतरताना या बॅगचा इतर प्रवाशांना त्रास होतो. विमानात सीटच्या वर असलेली सामान ठेवण्याची जागा हाऊसफुल्ल होऊन जाते. क्वचितप्रसंगी वरून सामान काढताना या मोठाल्या बॅगमुळे इतर प्रवाशांच्या डोक्याला इजा होण्याची शक्यता असते. विमानतळावर या बॅग वाहून नेण्यासाठी ट्रॉलीचा उपयोग करणे आवश्यक आहे. पण सामानासोबत लहान मुलांना बसवणे चुकीचे आहे. विमान कंपन्यांनी याकडे लक्ष द्यावे.

**डॉ. मदन काकडे**/९३७३११२४८७

●● ●●

### हाताला काम हवं !

ग्रामीण भागात विशेषता कोकणात रोजगाराची अपुरी साधने, पाण्याची कमतरता, हाताला अपुरे काम यास्तव तेथील उरली सुरली युवा पिढी शहरी भागात स्थलांतरित होत असून, साहजिकच बहुतांश शेत जमिनी ओस पडू लागल्या आहेत. डोंगर उजाड होत असून, एकेकाळी वाडे, खुराडी प्रत्येक घरी भरभरून असायची. परंतु आज ती सुद्धा रिकामी आहेत किंवा अस्तित्वात नाहीत. शेती निगडित पशुधन आणि लघुउद्योग निर्मित पक्षिधन यांच्यातही मोठ्या प्रमाणात घट होत आहे. वाडे, खुराडे रिकामी पडत आहेत अशीच परिस्थिती होत राहिली तर भविष्यासाठी ही परिस्थिती गंभीर असून वेळीच तज्ज्ञ, कोकणातील लोकप्रतिनिधी यांनी गांभीर्याने या संकटाकडे लक्ष घालून कोकण भूमीच्या सर्वांगीण विकासासाठी शेती, पशु, पक्षिधन, वाढविण्यासाठी, हाताला काम देण्यासाठी त्वरित उपाययोजना आखणे गरजेचे आहे. अजून वेळ गेलेली नाही.

**विश्वनाथ पंडित**/९५८८४५०४४२

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादकः प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# विस्तार न करता नांदेडहून स्वतंत्र वंदे भारत रेल्वे सुरु करा

## व्यापारी महासंघाची विभागीय रेल्वे व्यवस्थापकांकडे निवेदनाद्वारे मागणी

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

वंदे भारत रेल्वेचा विस्तार नांदेडपर्यंत करण्यात येणार असल्याची चर्चा आहे. हा जालना आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील नागरिकांवर अन्याय करणारा आहे. त्यामुळे स्वतंत्र वंदे भारत रेल्वे सुरु करण्याची मागणी जालना जिल्हा व्यापारी महासंघाने दक्षिण मध्य रेल्वेच्या विभागीय व्यवस्थापकांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, छत्रपती संभाजीनगर आणि जालना या प्रमुख औद्योगिक शहरांकडे आपले लक्ष वेधू इच्छितो. या भागात व्यापारी आणि उद्योजकांची संख्या झपाट्याने वाढत आहे. मुंबईला जाण्यासाठी वंदे भारत रेल्वेचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. ही रेल्वे नेहमीच प्रवाशांनी भरलेली असते. नांदेडपर्यंत वंदे भारत



रेल्वेच्या विस्तारीकरणामुळे छत्रपती संभाजीनगर आणि जालन्यातील प्रवाशांचा कोटा कमी होणार असल्याने व्यापारी व उद्योजकांवर अन्याय होणार आहे. त्याचा विस्तार नांदेडपर्यंत झाल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा निवेदनात देण्यात आला आहे. तसेच आठवडयातून ३ दिवस गुजरात राज्यासाठी विशेष रेल्वे सुरू करण्याची मागणीही निवेदनात करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे जालना रेल्वे स्थानकातील सुविधांमध्ये सुधारणा कराव्यात, रेल्वे स्थानकाच्या नवीन इमारतीचे बांधकाम तत्काळ पूर्ण करावे. स्वच्छतेकडे विशेष लक्ष द्यावे, ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग प्रवाशांसाठी आवश्यक सुविधा पुरवाव्यात, वंदे भारत ट्रेनचा नागपूरपर्यंत विस्तार करणे हा छत्रपती संभाजीनगर आणि उद्योजकांवर अन्याय होईल. हा निर्णय रद्द न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा व्यापारी महासंघाने निवेदनात दिला आहे. यावेळी व्यापारी महासंघाचे पदाधिकारी विनीत साहनी, संजय दाड, शामसुंदर लोया, दिलीपभाई शाह, विनोद पवार, विनोद कुमावत, साईनाथ चिन्नादोरे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

## संक्षिप्त

### अनाथांसाठी 'सावली' प्रकल्पला शत्रुघ्न कणसे व सावता काळे ची मदत



**तभा वृत्तसेवा**
**परतूर/प्रतिनिधी**

आज श्री संत गजानन महाराज मंदीर सोयजना परमार्थ आश्रम हातडी रोड येथे समाजातील निराधार अनाथ गरीब वणवण भटकणाऱ्या मुलांचा आधार म्हणून सुरू करण्यात येत असलेल्या सावली प्रकल्पाचे भव्य उद्घाटन देव देश धर्मासाठी सदैव कार्य करणारे थोर संत ह.भ.प.संजय महाराज पाचपोर यांच्या हस्ते संपन्न झाले त्यावेळी त्यांचे स्वागत भाजपा तालुका अध्यक्ष स.श्री.शत्रुघ्नजी कणसे भाजप युवा कार्यकर्ते संदीप पाचारे यांच्यासह मित्र परीवार सोबत महाराजांचे स्वागत करण्याचे आहोभाग्य लाभले. तसेच भाजपा तालुका अध्यक्ष स.श्री.शत्रुघ्न कणसे राहुल भैया मित्र मंडळ तर्फे ४२,०००/- हजार मदत तसेच सावता काळे यांच्याकडून ८ हजार रुपये मदत अनाथांचा आश्रमला देण्याचे ठरले.

### यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा व्याख्यानाला उस्फूर्त प्रतिसाद



**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**

सिल्लोड येथील राजर्षी शाहू डिफेन्स अकॅडमी व यशवंतराव चव्हाण महाविद्यालय सिल्लोड यांच्या संयुक्त विद्यमाने स्पर्धा परीक्षा पुस्तकांचे भव्य प्रदर्शन व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी उद्घाटक व मार्गदर्शक म्हणून सिल्लोड ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक मा. सचिन क्षीरसागर साहेब होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अशोक पंडित होते. सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते संत ज्ञानेश्वरांच्या प्रतिमेचे पूजन व स्पर्धा परीक्षा ग्रंथ प्रदर्शनाचे फित कापून उद्घाटन करण्यात आले. उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना सचिन क्षीरसागर यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेमध्ये यशस्वी होण्याचा मूलमंत्र दिला. विद्यार्थ्यांनी जीवनात ध्येय निश्चित करून स्पर्धा परीक्षेत यशस्वी व्हावे. स्पर्धा परीक्षेचा अभ्यासक्रम, पुस्तकाचे आकलन, प्रश्नपत्रिकाचे निरीक्षण, चालू घडामोडीसाठी वर्तमानपत्राचे वाचन महत्त्वाचे आहे. आई-वडिलांच्या कष्टांचा विचार करून त्यांच्या डोळ्यात आनंद निर्माण करणारे यश संपादन करा.परिस्थितीचे भांडवल न करता स्मार्ट वर्क करा. स्पर्धा परीक्षेत पुस्तकाच्या संकलनापेक्षा आकलन महत्त्वाचे आहे. स्पर्धा परीक्षेत मोठे स्वप्न बघून जीवनात यशस्वी व्हा.

अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक पंडित म्हणाले की, ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजूर पालकांच्या मुलांना स्वावलंबी बनवण्यासाठी स्पर्धा परीक्षा पुस्तकांची खरेदी केली. प्रतिकूल परिस्थितीमधील विद्यार्थ्यांनी या पुस्तकांचा अभ्यास करून अधिकारी व्हावे. स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांनी खचून न जाता कसून अभ्यास करावा. प्रत्येक क्षेत्रात स्पर्धा आहे. विद्यार्थ्यांनी अभ्यासाच्या माध्यमातून अधिकारी पदाची पात्रता निर्माण करावी असे अहवान केले.

पुस्तक प्रदर्शनात पोलीस, आर्मी, नेव्ही, तलाठी ,ग्रामसेवक, कृषी सहाय्यक, जलसंपदा, भूमि अभिलेख व स्पर्धा परीक्षेची विषयनिहाय पुस्तके व मासिके ठेवण्यात आली होती. या प्रदर्शनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना अनेक लेखकांच्या नवीन आवृत्तीच्या पुस्तकाचे दर्शन घडले. विद्यार्थ्यांच्या मनात वाचनाची उत्सुकता या प्रदर्शनाने निर्माण केली. स्पर्धा परीक्षेचे प्रदर्शन व व्याख्यानास महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. ज्ञानेश्वर शेजुळ, प्रास्ताविक प्रा.ज्ञानेश्वर हिलाले, आभार प्रा. निलेश गांगुर्डे यांनी मानले. यावेळी डॉ. जगदीश सावदेकर, प्रा. आजिनाथ काकडे, प्रा. निलेश मिसाळ, प्रा. जैस्वाल स्पर्धा परीक्षा व पोलीस भरतीची तयारी करणारे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महाकालेश्वर मंदिर रस्ता मार्गी लावणार -आ.अर्जुनराव खोतकर

## मूर्ती प्राणप्रतिष्ठा, शिवमहापूराण कथेची सांगता !

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

हनुमान घाट कट्टा परिसरातील श्री पलसिध्द सेवाश्रमात भगवान महाकालेश्वर व जगद्गुरु पलसिध्द महास्वामीजींच्या दर्शनासाठी येण्याकरता भाविकांच्या मागणीनुसार आपण रस्त्याच्या कामास प्रारंभ केला मात्र तांत्रिक अडचणी उद्भवल्या तरीही योग्य तो मार्ग काढून रस्त्याचा प्रश्न मार्गी लावणार असल्याचे वचन आ. अर्जुनराव खोतकर यांनी आज दिले.

हनुमान घाट कट्टा परिसरातील श्री पलसिध्द सेवाश्रमात भगवान महाकालेश्वर व जगद्गुरु पलसिध्द महास्वामीजींच्या मूर्तीची गुरुवारी ( ता.२६) ष. ब्र. १०८ वेदान्ताचार्य शिवाचार्य रत्न सिध्दलिंग शिवाचार्य यांच्या हस्ते विधीवत प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. तसेच शिवमहापूराण कथेची सांगता झाली. आ. खोतकर यांनी भेट देऊन दर्शन घेतले. सिद्ध चैतन्य शिवाचार्य



महाराज, प्रेममूर्ती जगदीशानंद शास्त्री, आदींची या प्रसंगी उपस्थिती होती. आ.अर्जुनराव खोतकर यावेळी बोलतांना म्हणाले की,पशुपालन ,दुग्ध व्यवसाय करणारा लिंगायत गवळी समाज प्रामाणिकपणे काबाडकष्ट करून जगतो या समाजात शिक्षणाचे प्रमाण कमी असून शिक्षणाचे प्रमाण वाढले पाहिजेत असे नमूद करत लिंगायत गवळी समाजाच्या सामाजिक सभागृह आणि मंगल कार्यालयासाठी प्रसंगी एक कोटीचा निधी देणार असल्याची घोषणा आ.अर्जुनराव खोतकर यांनी करताच टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला.

प्रेममुर्ती जगदीशानंद शास्त्री यांनी सांगता कथेचे निरूपण करतांना फुकट व सहज मिळते त्याची किंमत कळत नाही प्रसाद, संत, गुरु, माता-पिता यांच्यात कमीपणा पाहणारा नेहमी अपूर्ण राहतो असे सांगून जीवनात एकदा तरी जन्मदात्या माता-पित्यांचे पूजन करावे असा सल्ला जगदीशानंद शास्त्री यांनी दिला.यावेळी गणपती आणि रिध्दी- सिध्दी चा विवाह सोहळ्याचा सजीव देखावा साकारण्यात आला. आमच्या बाबांनी गणपती आणला...,महादेवाला माझ्या आवडते बेलाचे पान...! अशा संगीतमय भक्तीगीतांवर महिला व भाविकांनी ठेका धरला. शेवटी मंगल महाआरती करून भाविकांना महाप्रसाद वितरित करण्यात आला. श्री श्री श्री १००८ सद् धर्म सिंहासनाधिश्वर जगद्गुरु सिध्दलिंग राजदेशी यांचे आज आगमन झाले. सोहळ्यानिमित्त पंचमुखी महादेव मंदिर येथून मिरवणुक काढण्यात आली.मामाचौक, जुना मोंढा, सिंधी पंचायत भवन, विवेकानंद हॉस्पिटल, थाडेश्वर मंदिर मार्गे जात श्री पलसिध्द सेवाश्रम श्री महाकालेश्वर शिवमंदिर येथे मिरवणूक विसर्जित करण्यात आली. श्री पलसिध्द सेवाश्रमात शुक्रवारी ( ता. २७) कर्नाटक राज्यातील उज्ञयिनी पीठाचे श्री श्री श्री १००८ सद् धर्म सिंहासनाधिश्वर जगद्गुरु सिध्दलिंग राजदेशी यांच्या हस्ते कलशारोहण सोहळा तसेच धर्मसभा होणार आहे.

# मुलगा शेती करू देत नाही, विधवा आईची तहसीलदारांकडे धाव

**तभा वृत्तसेवा**
**परतूर/प्रतिनिधी**

तालुक्यातील हातडीयेथील माझा मुलगा मला माझी शेती कसायला देत नाही म्हणून त्याच्यावर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी, ७० वर्षीय विधवा आईने एका निवेदनाद्वारे तहसीलदार परतूर यांच्याकडे केली आहे. याबाबत दिलेल्या निवेदनात ७० वर्षीय गयाबाई विठ्ठल गाढवे रां. हातडी ता.परतूर यांनी म्हंटले आहे की, माझे पती स्व. विठ्ठल नबाजी गाढवे यांचा मृत्यू दि. २०/०८/ २०२४ रोजी झाला असून माझे पती ह्यांची हातडी गाव शिवारात गट. क्र. १४५ मध्ये शेती आहे त्यांनी हयात असतांना माझ्या मोठ्या मुलाला त्याच्या वाट्याला येणारी शेती देलेली आहे. आता माझ्या पतीच्या नावावर हातडी गाव शिवारात गट. क्र. १४५ मध्ये जी शेती उरलेली आहे ती शेती मला माझा उदरनिर्वाह करण्यासाठी आवश्यक आहे, कारण मी कोणासोबत राहत नाही, मी वेगळी एकटी राहत आहे. मी माझ्या पतीच्या शेतात गेली असता मला माझा मोठा मुलगा उध्दव गाढवे हा शिवीगाळ करून काठी घेऊन धावून येतो, मला जीवे मारण्याच्या धमक्या देतो, मी शेती पेरण्यासाठी दुसऱ्याला दिली तर त्याला ही धमकावून शेताच्या बाहेर काढून देतो. त्यामुळे आज पर्यन्त शेतात काहीही पीक घेता आले नाही. त्यामुळे माझा उदरनिर्वाहचां प्रश्न निर्माण झाला आहे.यासंदर्भात पोलीस निरीक्षक , पोलीस स्टेशन परतुर यांना ही तक्रार अर्ज केला होता. परंतु त्यांनी कोणत्याच प्रकारे दखल घेतली नसल्याचे निवेदनात म्हटले आहे.तहसीलदार यांनी न्याय देण्याची मागणी केली आहे. उपविभागीय अधिकारी यांनाही निवेदनाची प्रत देण्यात आली आहे.

# श्री समर्थ विद्यालयात वीरबालदिना निमीत्त चित्रप्रदर्शनी चे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**परतूर/प्रतिनिधी**

परतूर तालुक्यातील पाटोदा माव येथील श्री समर्थ माध्यमिक विद्यालयात वीरबाल दिनानिमीत्त वीरबालक बाबा जोरावारसिंह जी व बाबा फतेहसिंह जी यांच्या संपुर्ण जीवनावर आधारीत रंगीत छायाचित्रांचे प्रदर्शन शाळेत भरविण्यात आले होते. सव्वीस डिसेंबर हा दिवस संपुर्ण देशात विरबालदिन म्हणुन साजरा केला जातो. आपृल्या मातृभुमीप्रती, धर्माप्रती प्राणत्याग करनारे कोवळ्या वयातील बालकांचे हे बलिदान चिरकाल प्रेरणा देणारे आहे असे प्रतीपादन गट साधन केंद्राचे गट समन्वयक श्री कल्याणजी बागल यांनी केले. नुकतेच जाहीर झालेल्या मुख्यमंत्री माझि शाळा - सुंदर



शाळा या स्पर्धेत परतुर तालुक्यातील संस्था गटातुन श्री समर्थ माध्यमिक विद्यालयास तृतीय पारितोषीक मिळाल्याबद्दल विद्यालयाचे कौतुक व अभिनंदन शगट समन्वयक कल्याण बागल यांनी केले. येथील शाळेत सातत्याने विवीध ऊपक्रम व कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत असल्याबद्दल श्रीष्टी केंद्रा चे केंद्र प्रमुख श्री शंकरराव थोटे सरांनी शाळेचे कौतुक केले.यावेळी शाळेचे मुख्याध्यापक सुरेश पाटोदकर यांच्या संकल्पनेतुन व संकलनातुन सदरील रंगीत छायाचित्रांचे प्रदर्शन आयोजीत करण्यात आले होते. श्री धनबा सर व विद्यालयाचे सर्व कर्मचारी या वेळी ऊपस्थीत होते.पसायदानाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# ख्रिसमस ट्रॉफीचे आ.अर्जुनराव खोतकर यांच्या हस्ते थाटात उदघाटन

**तभा वृत्तसेवा**
**जालना/ प्रतिनिधी**

ख्रिसमस निमित्त स्वर्गीय आनंद भाऊ कांबळे मित्र मंडळाच्या वतीने ख्रिसमस ट्रॉफी २०२४-२५ चे आयोजन करण्यात आले असून याचे दिनांक २६ डिसेंबर रोजी ख्रिसमस ट्रॉफीचे मोठ्या थाटात आ. अर्जुनराव खोतकर यांच्या हस्ते उदघाटन करण्यात आले.

मागील ३१ वर्षापासून स्वर्गीय आनंद भाऊ कांबळे यांनी सुरुवात केलेल्या ख्रिसमस ट्रॉफीचे यावर्षी हि आयोजन करण्यात आले आहे. यावर्षी ३१ वे वर्ष असल्याने प्रथम पारितोषिक ३१ हजार १११, तर द्वितीय पारितोषिक १५ हजार ५५५ रुपये असे ठेवण्यात आले आहे. यावेळी कार्यक्रमाचे उदघाटक म्हणून आ. अर्जुनराव खोतकर हे होते तर अध्यक्ष म्हणून रेव्हरंड यु. बी. म्हांकाळे हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून इंडीयन ख्रिश्चन युनायटेड ब्रिगेडचे संस्थापक अध्यक्ष रविकांत दानम, शिवसेना जिल्हा प्रमुख भाऊसाहेब घुगे, महानगर शहराध्यक्ष विष्णू पाचफुले, मेघराज चौधरी, चंद्रसेन निर्मळ, इंडीयन ख्रिश्चन युनायटेड ब्रिगेडचे संस्थापक सचिव लेवी निर्मळ, कोषाध्यक्ष बाबा कसबे, आयोजक इंडीयन ख्रिश्चन युनायटेड ब्रिगेडचे उपाध्यक्ष तथा शिवसेना दलित आघाडी शहर प्रमुख भोला कांबळे, यांची उपस्थिती होती

यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना आ. अर्जुनराव खोतकर म्हणाले की मागील ख्रिस्ती धर्माने शिकविलेल्या शिकवणी कीप्रमाणे सर्व समाज बांधवानी एकत्र राहणे यासाठी युवकांसाठी आमचे सहकारी भोला कांबळे हे ख्रिसमस ट्रॉफीचे आयोजन करतात.



यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांनी आपले मत मनोगत व्यक्त करताना सांगितले की मागील ३१ वर्षापासून ख्रिसमस ट्रॉफी सुरू आहे ही खूपच आनंदाची बाब आहे. या क्रिसमस ट्रॉफीमध्ये ४० संघाने सहभाग घेतला असून त्यांनी आपली खेळ भावना दाखवत स्पर्धा यशस्वीपणे पार पाडावी. क्रिसमस ट्रॉफीचे उत्कृष्ट आयोजन करण्यात आले असून डोळ्याचे पारणे फेडणारा आहे असे देखील मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी अनमोल कांबळे, बबन जगधने, सुभाष कांबळे, रिक्की कांबळे, राहुल आव्हाड, काका ससाने, जॉन हतागळे, विजय वाघमारे, सचिन जगधने, राज भालेराव, वैभव निर्मल, आशोक आव्हाड, गणेश खरात, आमित आडबोले, विजय पाखरे, सुमित गायकवाड, स्वपनिल हिरे, अभिषेक घोरपडे, आदित्य कांबळे, करणं कांबळे, अर्जुन कांबळे, आदर्श कांबळे,स्वप्नील कांबळे व सर्व स्व. आनंद भाऊ कांबळे मित्र मंडळ प्रयत्न करीत आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रिक्की कांबळे यांनी केले.

# परतूर तालुका पत्रकार संघाची कार्यकारिणी जाहीर

## परतूर पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी शामसुंदर चित्तोडा, सचिवपदी प्रभाकर प्रधान,उपाध्यक्षपदी गणेश लालझरे

**तभा वृत्तसेवा**
**परतूर/प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य अखिल भारतीय परतूर पत्रकार संघाची तालुका कार्यकारिणी जाहीर करण्यात आली यामध्ये अध्यक्ष म्हणून शामसुंदर चित्तोडा यांची बिनविरोध निवड करण्यात आली तर सचिव पदी प्रभाकर प्रधान तर उपाध्यक्ष म्हणून गणेश लालझरे यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली.

दरम्यान, रविवारी (दि.२९) शहरातील शासकीय विश्रामगृहात ज्येष्ठ पत्रकार शिवकुमार भारुका यांच्या अध्यक्षतेखाली नवीन कार्यकारिणी निवडी बाबत बैठक आयोजित करण्यात आली आहे. यावेळी ही निवड करण्यात आली तर उर्वरित कार्यकारणी कोषाध्यक्ष पांडुरंग शेजुळ,सह कोषाध्यक्ष इम्रान कुरेशी सह सचिव कैलाश चव्हाण यांची



प्रमुखनिवड करण्यात आली.तर कायदेविषयक सल्लागार ऍड.सुरेश काळे सल्लागार पदी शिवकुमार भारुका,शेषराव वायाळ,सुनील शिवणगिरी, रशीद बागवान,योगेश बरीदे,सय्यद वाजेद, सुरेश कवडे,संजय देशमाने,शेख अथर,हनुमंत दवडे, सुधाकर जाधव,कैलास सोळंके,प्रा.गणेश शिंदे,संतोष आखाडे याची निवड करण्यात आली. यावेळी, संतोष शर्मा,कुलदीप बिनगे,सागर काजळे,शेख असेफ,रवी भद्रगे,पवन राशनकर, राहुल मुजमुले,आदींची यावेळी उपस्थिती होती. दरम्यान,यावेळी नवनिर्माण कार्यकारिणीचा सत्कार करण्यात आला.

# अनोळखी मृत महिलेची ओळख पटविण्यात हिंगोली पोलिसांना यश

## स्थानिक गुन्हे शाखा, औंढा पोलिसांच्या पथकाची कामगिरी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ डिसेंबर.**
औंढा नागनाथ पोलिस ठाण्याच्या हद्दीत मौजे नागेशवाडी शिवारात मसोबा मंदिराचे पाठीमागे दि २४ डिसेंबर रोजी जंगल परिसरात एका २५ ते ३० वयाच्या अनोळखी महिलेचे प्रेत कोणीतरी टाकले. सदर प्रेताचे नाका तोंडातून रक्त येत असल्याने आणि अंगावर जखमा असल्याने सदरचा प्रकार खूनाचा असावा अशी पोलिसांनी शक्यता वर्तवली. या प्रकरणाचा तपास करण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेच्या तीन व औंढा नागनाथ पोलिस ठाण्याचे दोन पथके स्थ-ापन करण्यात आली होती. या पथकांनी पुरावे, सायबर तंत्रज्ञानाची मदत घेऊन खूनाचा छडा लावला असून आरोपीलाही ताब्यात घेतले आहे, अशी माहीती पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी रविवारी पत्रकार परिषदेत दिली.

औंढा नागनाथ तालुक्यातील नागेशवाडी शिवारात मसोबा मंदिराचे पाठीमागे जंगल परिसरात एका महिलेचा मृतदेह पोलिसांना आढळला. एका बॅगमध्ये भरून हा मृतदेह आणल्याचे दिसून आले. त्यानंतर शवविच्छेदन अहवालात या महिलेचा खून झाल्याचे स्पष्ट झाले होते त्यावरून दि २५ डिसेंबर रोजी औंढा नागनाथ पोलिस ठाण्यात खूनाचा गुन्हा दाखल झाला.

दरम्यान, घटनास्थळावर काहीही सापडले नसल्याचे महिलेची ओळख पटविणे व खूनाचा उलगडा करण्याचे आव्हान पोलिसांसमोर होते. त्यानंतर पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक विकास पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे तीन आणि औंढा नागनाथ पोलिस ठाण्याचे दोन पथके स्थापन करण्यात आली. या पथकांनी दि २८ डिसेंबर रोजी पुन्हा एकदा पाहणी केली असता त्याठिकाणी एक कार्ड सापडले होते. या कार्डवरून पोलिसांचा तपास सुरू झाला. पुरावे आणि सायबर तंत्रज्ञानाच्या मदतीने पथकांनी छत्रपती संभाजीनगर व जामखेड गाठले. सदरचे प्रेत अलका बाजीराव बेद्रे वय २९ रा सदाफुले वस्ती, जामखेड जि अहिल्यानगर हिचे असल्याचे निष्पन्न झाले. त्यावरून पोलिस पथकाने अधिक माहीती घेतली असता सदर महिलेचे व आरोपी श्रीकांत सुरेश पिनलवार वय २४ रा मुघट, ता मुदखेड, जि नांदेड याचे मागील नऊ महिन्यापासून अनैतिक प्रेम संबंध असल्याचे निदर्शनास आले. त्यावरून महिला व आरोपी यांचे सतत वाद होत असल्याने आरोपीने छत्रपती संभाजीनगर येथील लाडगाव येथील भाड्याच्या खोलीमध्ये दि २३ डिसेंबर रोजी मध्यरात्री अलकाचा गळा दाबून खून करून तिचा मृतदेह पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने जंगलामध्ये टाकल्याची माहीती मिळाल्यानंतर आरोपीस स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकांनी आदीलाबाद येथून ताब्यात घेतले.

सदरची कामगिरी पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील, पोनि विकास पाटील, पोनि गणेश राहीरे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि संतोष शेकडे, सपोनि शिवसांब घेवारे, पोउपनि विक्रम विठुबोने, माधव जिव्हारे, कपील आगलावे, अंमलदार पांडूरंग राठोड, कोंडीबा मगरे, विक्रम कुंदनानी, गजानन पोकळे, किशोर कातकडे, निरंजन नलवार, दत्ता नागरे, आकाश टापरे, किशोर सावंत, विशाल खंडागळे, विठ्ठल काळे, नरेंद्र साळवे, हरिभाऊ गुंजकर, इमरान सिद्दीकी, इकबाल शेख यांनी केली आहे.

# नववर्षाचे स्वागत जबाबदारी सतर्कतेने करावे- श्रीकृष्ण कोकाटे



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ डिसेंबर**
नागरिकांनी नववर्षाचे स्वागत आणि नववर्षाचा आनंद जबाबदारीने आणि सतर्कतने साजरा करावा. आनंद साजरा करतांना हुल्लडबाजी अथवा ड्रंक अॅन्ड ड्राईव्ह करतांना आढळल्यास अशांवर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी दिला आहे.

३१ डिसेंबर नंतर नवीन वर्षाला सुरूवात होत आहे. या पार्श्वभूमीवर नवीन वर्षाचे स्वागत करण्यासाठी तरूणांसह नागरिक मोठ्या संख्येने आनंदोत्सव साजरा करतात. यानिमित्त विविध ठिकाणी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते परंतु सद-रील कार्यक्रम जबाबदारीने आणि सतर्कतेने साजरे करण्याचे आवाहन पोलीस अधीक्षक कोकाटे यांनी केले आहे. शहरात नवीन वर्षाच्या पार्श्वभूमीवर सुरक्षिततेसाठी ठिकठिकाणी नाकाबंदी, पेट्रोलिंग आणि ड्रंक अॅन्ड ड्राईव्हच्या केसेस करणार आ-होत. दि ३० डिसेंबर पासून नाकाबंदी करण्यात येत आहे. यासाठी जिल्ह्यात ३१ पथके स्थापन करण्यात आली असून त्यामध्ये एक अधिकारी आणि चार पोलिस कर्मचारी यांचा समावेश असणार आहे. तसेच त्यांच्याजवळ ब्रेद अॅनलायझर देखील असणार आहे. वाहन थांबविण्यासाठी योग्य ती टीम आणि वाहने असणार आहेत. तरूणांनी त्यांच्या आरोग्यावर लक्ष द्यावे. तसेच करिअरवर लक्ष केंद्रीत करावे त्यामुळे त्यांचे नवीन वर्ष चांगले जाणार आहे. कोणीही ड्रंक अॅन्ड ड्राईव्ह करू नये, फटाका सायलेन्सरवर फिरणे, ट्रीपल सीट फिरू नये अन्यथा कडक कारवाई करण्यात येणार आहे.

तसेच धाबाचालक तसेच इतर ठिकाणी विनापरवाना दारूविक्री करणाऱ्यावर कठोर कार्यवाही करण्यात येणार आहे. त्यासाठी पोलिस प्रशासन सज्ज झाले असून नवीन वर्षाच्या जिल्ह्यातील सर्व नागरिकांना यावेळी पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी हार्दीक शुभेच्छा दिल्या.

# शासकीय विश्रामगृहाची इमारत कॅन्टीन विना पडली ओस

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ डिसेंबर**
शहरामध्ये शासकीय विश्रामगृहाची टोलेजंग इमारत मागील काही वर्षापूर्वी उभारण्यात आलेली आहे. या ठिकाणी यापूर्वी कॅन्टीनची व्यवस्थाही परीपूर्ण होती. कंत्राटदाराचे देयके थकल्याने विधानसभा निवडणुकीपूर्वी कंत्राटदाराने हे कॅन्टीन बंद केली. आज परिस्थितीमध्ये कंत्राटदाराचा कार्यकाळ पूर्ण झाला असला तरी विश्राम गृहाची इमारत मात्र कॅन्टीग विना ओस पडली आहे.

हिंगोली शहर हे जिल्ह्याचे ठिकाण आहे. या ठिकाणी जिल्हाधिकारी कार्यालयासह अनेक महत्वाची कार्यालये आहेत. त्यामुळे या ठिकाणी कोट्यावधी रूपये खर्चातून शासकीय विश्रामगृहाची इमारत जिल्हा निर्मिती नंतर उभारण्यात आली. हे विश्रामगृह भव्यदिव्य स्वरूपात असल्याने अनेक मंत्र्यांसह, लोकप्रतिनिधी व विविध पक्षातील पदाधिकारी, सामाजिक संघटना आदींच्या बैठका या शासकीय विश्राम गृहामध्ये घेण्यात येत होत्या. त्यामुळे शासकीय विश्रामगृहावर प्रत्येक दिवशी नागरिकांची मोठी रेलचेल असायची. विशेष म्हणजे शासकीय विश्रामगृहात कॅन्टीन सुद्धा उपलब्ध होती. सन २००८ पासून हे कॅन्टीन कंत्राटी स्वरूपात सुरू करण्यात आले. ज्यामध्ये साई मॅनेजमेंट सिस्टीम नांदेड यांना कंत्राट देण्यात आले होते. सन २०१९ ते २०२४ या वर्षामध्ये पुणे येथील धनंजय दाभोळकर यांच्या अनाक्षी इंटर प्रायजेसला हे कंत्राट देण्यात आले होते. कंत्राटी स्वरूपात कॅन्टीन चालविण्याकरीता दिल्याने या ठिकाणी नागरिकांची सतत ये-जा असायची. विशेष म्हणजे कॅन्टीनचा दर्जाही चांगला असल्याने अनेक मंत्री, लोकप्रतिनिधी समाधानी होते. कंत्राटदाराचे शासनाकडे लाखो रूपयाचे देयके थकल्याने त्यांनी वारंवार पाठपुरावा करून सुद्धा देयके मि ळाले नसल्याने विधानसभा निवडणुकीपूर्वी कॅन्टीग बंद केली. परिणामी कॅन्टीनमध्ये काम करणाऱ्या ३० कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांवर उपासमारीची वेळ आली. अद्यापपर्यंत कॅन्टीन संदर्भात निविदा प्रक्रिया राबविण्यात आली नाही. त्यामुळे भव्यदिव्य उभारण्यात आलेल्या शासकीय विश्रामगृहात कॅन्टीन सुरू नसल्याने ही इमारत ओस पडली आहे. शासकीय विश्रामगृहात सध्या शुकशुकाट पहायला मिळत आहे.

शासकीय विश्रामगृहात अधुनमधून मंत्री, लोकप्रतिनिधी व विविध राजकीय पक्षाचे पुढारी येत असतात. अशावेळी विश्राम गृहात कॅन्टीन नसल्याने अनेकांची गैरसोय होत आहे. त्यामुळे जिल्हा प्रशासन व सार्वजनिक बांधकाम विभागाने याकडे तात्काळ लक्ष घालावे अशी मागणी होत आहे.



**हिंगोली- शहरातील बियाणी नगर येथे रविवारी स्वयंसिध्दा नारी मंचच्यावतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवन चरित्रावर कल्पनाताई भागवत यांनी व्याख्यान दिले. यावेळी व्यासपीठावर डॉ संध्या बैस, अॅड मनिषा गडदे, तेजकुमार झांजरी यांच्यासह स्वयंसिध्दा नारी मंचच्या पदाधिकारी उपस्थित होत्या. या व्याख्यानाला मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या. छाया- विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### अतिक्रमण धारकांना मालकी हक्क द्या- नवघरे



वसमत- वसमतचे आमदार राजू नवघरे यांनी विधानभवनात सरकारी गायरान जमिनीवर अतिक्रमण धारकांना घरकुल बांधकामासाठी मालकी द्यावेत, अशी मागणी केली आहे. वसमत विधानसभा मतदारसंघासह संपूर्ण राज्यभरात सरकारी गायरान जमिनीवर अतिक्रमण करून नागरिक राहतात. अनेक वर्षांपासून वास्तव्य करून देखील या नागरिकांना नमुना नंबर आठ 'अ' मालकी हक्क नसल्याने अनेक शासकीय योजनांपासून वंचित राहावे लागत आहे. रमाई आवास योजना, मोदी आवास योजना, पीएम आवास योजना, शबरी योजना अशा विविध योजनेअंतर्गत घरकुल बांधकामास अडथळे येत आहेत. त्यांना कुठल्याही शासकीय सुविधा मिळत नाहीत. त्यांच्याकडे घरकुल बांधकाम करण्यासाठी तसेच इतर योजना घेण्यासाठी नमुना नंबर आठ 'अ' मालकी हक्क नसल्याने केवळ भोगवटदार आहेत. त्यामुळे त्यांना त्यांचा मालकी हक्क मिळून घरकुल बांधकाम करण्यासाठी नमुना नंबर आठ उप-लब्ध करून द्यावे, अशी मागणी नवघरे यांनी केली.

### आदर्श महाविद्यालयात तंत्र प्रदर्शनाला प्रतिसाद

हिंगोली- येथील आदर्श महाविद्यालयाच्या उच्च माध्यमिक व्यवसायिक अभ्यासक्रमतील इलेक्ट्रॉनिक्स टेक्नॉलॉजी, मेडिकल लॅब टेक्नॉलॉजी व अकाउंटिंग अँड ऑफिस मॅनेजमेंट या विभागातील विद्यार्थी व शिक्षकांनी तंत्र प्रदर्शनात सहभाग घेतला. व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय व कौशल्य विभाग यांच्या वतीने हिंगोली येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत जिल्ह्या-तील शासकीय व निमशासकीय शाळा महाविद्यालय व औद्योगिक प्रशिक्षण संस्था व तंत्र महाविद्यालयतील तांत्रिक गटाचे तंत्र प्रदर्शन आयोजित करण्यात आले. प्राचार्य प्रो.डॉ. विलास आघाव यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. संजय कयाल, मेजर पंढरीनाथ घुगे, प्राध्यापक पंडित कु-हाडे प्रा. विजयकुमार जट्टे व विभागातील शिक्षक व विद्यार्थी यांनी यामध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला. उप-स्थित मान्यवरांनी इलेक्ट्रॉनिक्स टेक्नॉलॉजी च्या विद्यार्थ्यांनी सादर केलेले ऑटोमॅटिक स्ट्रीट लाईट कंट्रोल प्रोजेक्ट, लेझर ऑटोमॅटिक आलाराम प्रोजेक्ट, ऑटोमॅटिक वॉटर पंप कंट्रोल प्रकल्प व रक्तगट तपासणी प्रकल्प उपयुक्त असून समाजाला नितांत गरजेचे आहेत असे मनोगत व्यक्त केले. मेडिकल लॅबोरेटरी टेक्निक्सच्या वतीने विद्यार्थ्यांनी रक्तगट तपासणी अचूक करून दिली.

# मागण्या पूर्ण न केल्यास आरोग्य सेविका, सेवकांचा उपोषणाचा इशारा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ डिसेंबर**
आरोग्य विभाग जिल्हा परिषद अंतर्गत प्रा केंद्र व उपकेंद्र स्तरावर आरोग्य सेविका, सेवक, आरोग्य सहायिका सहाय्यक या पदावर वर्षानुवर्ष अविरत आरोग्य सेवा देतात परंतु सदर सेवा देताना संबंधित आरोग्य कर्मचारी यांना सेवेत देण्यात येणाऱ्या पदोन्नती आश्वासित प्रगती लाभ देण्यास आरोग्य विभाग उद-ासीन असून आरोग्य अधिकारी यांना वारंवार जिल्हा परिषद नर्सेस संघटनेने निवेदने दिली परंतु मागण्या पूर्ण होत नसल्यामुळे दि ३० डिसेंबर पासून बेमुदत उपो-षणाचा इशारा संघटनेच्यावतीने देण्यात आला आहे.

यापूर्वी देखील मागण्यांसंदर्भात आरोग्य कर्मचारी संघटनेच्यावतीने उपोषण केले होते तेव्हा देखील आश्वासन देऊन सुद्धा चार महिने उलटून गेले असून अद्याप पर्यंत कोणतीही कारवाई करण्यात आली नसल्याने नाईलाजास्तव पुन्हा एकदा नर्सेस संघटनेकडून मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सहा डिसेंबर २०२४ रोजी पद्धतीने प्रक्रिया व आश्वासित लाभ यासारख्या मागण्या तात्काळ निकाली काढण्याबाबत निवेदन दिले असून सदरील प्रकरणे विहित कालावधीत निकाली न काढल्यास ३० डिसेंबर पासून महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद नर्सेस संघटनेच्यावतीने बेमुदत उपोषण संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी नर्सेस संघटनेच्या उपोषणामध्ये इतर सर्व संघटना यामध्ये सक्रिय सहभाग देणार आहेत. तसेच जोपर्यंत ही प्रकरणी निकाली काढणार नाहीत तोपर्यंत बेमुदत उपोषण सुरू राहणार आहे सदरील प्रकरणी लवकरात लवकर संबंधितांचे सेवाविषयक अनुज्ञेय लाभ देऊन उपो-षणामुळे रुग्णांची गैरसोय होणे टाळावी अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. निवेदनावर श्रीमती ज्योती बांगर, अविनाश चव्हाण, पांडुरंग बळेगावकर, किरण सूर्यवंशी, शेजुळकर, गजानन कदम आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# हिंगोलीत अनधिकृतपणे बॅनर लावणाऱ्या विरोधात गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ डिसेंबर**
शहरातील नांदेड नाका अग्रसेन चौकात विनापरवाना, बेकायदेशीर व अनधिकृतपणे बॅनर लावल्याप्रकरणी हिंगोली नगर पालिकेने संबंधीताविरोधात तक्रार दिल्यामुळे हिंगोली शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हिंगोली नगर पालिकेचे मुख्याधिकारी अरविंद मुंढे यांनी शहरात विनापरवाना, बेकायदेशीर आणि अनधिकृतपणे बॅनर लावणाऱ्या विरोधात मोहीम उघडली आहे. या बॅनरमुळे शहराचे विद्रुपीकरण आणि शहर बकाल दिसत आहे. शहरा-तील गांधी चौक, महावीर चौक, अग्रसेन चौक, खटकाळी बायपार, शासकीय विश्रामगृह, जिल्हाधिकारी कार्यालय, नगर परिषद कार्यालय तसेच विविध ठिकाणी मोठ्या प्रमाणावर राजकीय मंडळीसह इतर लोक वाढदिवसाचे, नेत्यांचे मोठमोठे बॅनर लावतांना दिसत आहेत. या बॅनरमुळे नांदेड नाका, गांधी चौक तसेच महावीर चौक याठिकाणी वाहतुकीस अडथळा निर्माण होत होता. सर्वसामान्य नागरिकांना या बॅनरचा नाहक त्रास आणि धोकाही निर्माण झाला होता. नगर पालिकेचे मुख्याधिकारी अरविंद मुंढे यांनी शहरातील अनधिकृत बॅनर हटविले असून असे बॅनर लावणाऱ्यावर कार्यवाहीचे आदेश दिले होते. त्यानुसार येथील नांदेड नाका अग्रसेन चौकात अग्रसेन महाराजांच्या पूतळ्यालगत समोरील बाजूला भावी नगरसेवक साजीद दादा यांच्या वाढदिवसाचे अनधिकृत बॅनर लावल्याचे आढळले. सद-रील बॅनर रोहीत पोतलवार यांनी लावल्याचे निदर्शनास आल्यानंतर नगर पालिकेचे कर्मचारी आकाश देशमुख यांनी रितसर शहर पोलिस ठाण्यात तक्रार दिली असून पोलिसांनी संबंधीतांवर गुन्हा दाखल केला आहे.

# आखाडा बाळापूर येथे भाजपची सदस्य नोंदणी कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ डिसेंबर**
कळमनुरी तालुक्यातील बाळापुर येथे कुसुमताई सभागृहात भारतीय जनता पक्षाच्यावतीने सदस्य नोंदणी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.



यावेळी भारतीय जनता पक्षचे प्रदेश उपाध्यक्ष तथा माजी आमदार गजान-नराव घुगे यांची प्रमुख उपस्थिती होती. जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली भाजपा सदस्य नोंदणीची बैठक संपन्न झाली. बैठकीचे प्रास्ताविक तालुकाध्यक्ष शंकर सुर्यवंशी यांनी केले. गजानन घुगे यांनी मार्गदर्शन केले. जिल्हा अध्यक्ष फुलाजीराव शिंदे यांनी बैठकीस संबोधित केले. तसेच खोबराजी पाटील नोंदणी विषयी माहिती दिली. तसेच डॉ जयदीप देशमुख यांनी मार्गदर्शन केले. डॉ सुधाकर लोमटे यांनी तालुक्यात जास्तीतजास्त नोंदणी करण्याविषयी सांगितले. सुत्रसंचलन मारोतराव देशमुख यांनी केले. बैठकीस सरचिटणीस उमेश नागरे, रुपेश पाटील, सरचिटणीस विठ्ठल भोयर, उमेश सोमाणी, भैयाजी दरक, सुरेशराव नागरे, शहराध्यक्ष गजानन बोंढारे, महेश गोविंदवार, तुकाराम ढोणे, पुष्पाताई शिंदे, दामु अण्णा शिंदे, अशोक संगेकर, बोथीकर, ओम ठमके, विजय कनके, दतराव माहोरे, सर्व पदाधिकारी व शक्ती केंद्र प्रमुख व बुथ प्रमुख उपस्थित होते.

# सरजुदेवी विद्यालयातील विद्यार्थीनींचे शैक्षणिक साहीत्य निर्मितीत यश

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ डिसेंबर**
आदर्श महाविद्यालय हिंगोली इथे श्रीनिवास राम ानुजन यांची जयंतीनिमित राष्ट्रीय गणित दिनाचे औचित्य साधून स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ व आदर्श एज्युकेशन सोसायटी हिंगोली यांचा



संयुक्त विद्यमाने शैक्षणिक साहित्य व प्रश्न मंजुषा स्पर्धा चे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत अनेक शाळांनी सहभाग नोंदविल होता. यामध्ये सरजुदेवी भिकूलाल भारुका आर्य कन्या विद्यालयातील कु अनुष्का श्यामराव कदम व अक्षरा सुनिल पोपलाईतकर यांचा प्रमाणाचे मुलभत प्रमेय या शैक्षणिक साहीत्याला प्रथम क्रमांक मिळाला. तसेच आयेशा फतेमा मोईन शेख व महेक अमजद खान पठाण यांचा बहुउद्देशीय गणित उपकरण याला तृतीय क्रमांक आला. तसेच प्रश्न मंजुषा स्पर्धामध्ये प्रियंका देशमुख, मधुरा मनोज गौतम, भाविका म रळे व दिव्या धवसे यांच्या संघाने प्रथम क्रमांक पटकविला. आदर्श महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ विलास आघाव यांचा हस्ते पारितोषिक व प्रमाण पत्र देण्यात आले. प्रोत्साहनपर श्रुती दिपक काटे, सानिका संजय वानखेडे, महेक शकील शेख, सना पठाण यांना पारितोषिक प्रदान करण्यात आले. यश मिळवलेल्या विद्यार्थीनींचे संस्थेचे सचिव अनिल भारूका, मुख्याध्यापक सीके देशपांडे, धीरज शर्मा, एल ए देव यांच्यासह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# बेल भंडार..खोबऱ्याची..उधळण करत पारंपरिक पद्धतीने खंडोबा पालकीला प्रारंभ

**तभा वृत्तसेवा**
**लोहा,दि. २९ डिसेंबर**

दक्षिण भारतात काशी म्हणुन प्रसिध्द असलेल्या मार्तंड मल्हारी देवाचा जयघोषात करत 'येळकोट येळकोट जय मल्हार' म्हणत, बेलभंडा-याची उधळण करुन पारंपारीक पध्दतीने माळेगावच्या खंडोबा देवस्थान पालकीला प्रारंभ. लाखो भाविकांनी पालखीचे दर्शन घेतले. शासकीय विश्रामगृहावर पालखीतील नाईकांचा फेटा, श्रीफळ देऊन मानसन्मान केला. यावेळी राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील,आ. प्रताप पाटील चिखलिकर, आ. आनंद बोडांरकर,लोहा नगरीचे माजी नगराध्यक्ष कल्याण सावकार सुर्यवंशी,माजी जि.प सदस्य, हंसराज पाटील बोरगावकर,माजी जि.प. सदस्य संजय कऱ्हाळे, राष्ट्रवादीचे मनोहर पा. भोसीकर, माळेगावच्या सरपंच कमलबाई रुस्तुमराव धुळगंडे,कृर्षी उत्पन्न बाजार समिती सदस्य साहेबराव काळे,अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक डॉ संतोष तुबाकले, उप मुख्य कार्यकारी अधिकारी तथा माळेगाव यात्रा सचिव मंजूषा कापसे,



नारायण मिसाळ, रेखा काळम-कदम, अमित राठोड, शिक्षणाधिकारी डॉ. सविता बिरगे, समाजकल्याण अधिकारी सत्येंद्र आऊवार, कार्यकारी अभियंता अमोल पाटील, पशुसंवर्धन अधिकारी डॉ. बोधनकर, रोहित शिंदे, उपविभागीय अधिकारी तहसीलदार विठ्ठल परळीकर, कंधार तहसिलदार गोरे, उपविभागीय अभियंता मोहन पाटील पवार गट विकास अधिकारी अडेराघो आदींची उपस्थिती होती. मानक-यांचा मानसन्मान पालखीचे मानकरी गणपतराव मल्हारी नाईक (रिसनगाव), गोविंदराव नागेशराव महाराज (कुरुळा), व्यंकटराव मारोतीराव पांडागळे (शिराढोण), खुशाल भगवानराव भोसीकर (पानभोसी), गोविंदराव बाबाराव नाईकवाडे (पानभोसी), पांडुरंग नारायणराव पाटील (माळेगाव), मल्हारी रावसाहेब पाटील (माळेगाव), विजयकुमार शंकरराव कनकंदडे (आष्टुर) या मानक-यांचा जिल्हा परिषदेच्या वतीने मानधन देऊन फेटा बांधून गौरव करण्यात आला. यात्रेत वाघ्या-मुरळी, वारुच्या आसुडाचे फटके. 'उत्तम जागा पाहूनी; मल्हारी देव नांदे गड जेजूरी' 'उत्तराची जेजूरी गडाला नऊ लाख पायरी' असा घोष करत वाघ्या मुरळी खंडोबाची सेवा करत पालकीच्या समोर. पारंपारीक पध्दतीने वेशभुषेत होते. गळ्यात कवडयाच्या माळा, 'कपाळी लांब हळदीचा मळभट भरुन हातापायावर आसुडाचे फटके मारत' वाघ्या मुरळी डफाच्या तालावर पालखीच्या जथा दिसुन येत होता. वाघ्या मुरळीला पाहण्यासाठी हजारो भाविकांनी मोठी गर्दी केली आह.

**माळेगांव यात्रेवर शासकीय दुखवट्याचे सावट**

माळेगांव यात्रेत शासकिय अधिकारी कमी प्रमाण दिसुन येत होते.लातुरचे मंत्री बाबासाहेब देशमुख, स्थानिक मतदारसंघाचे आ.प्रताप पाटील चिखलीकर, दक्षिण नांदेड मतदारसंघाचे आ.आंनदराव बोंढारकर यांनी मनोभावे दर्शन घेण्यासाठी माळेगांव यात्रेत हाजरी लावली पण.दरवर्षी शासकीय विश्रामगृहावर जशी गर्दी असते तशी गर्दी दिसुन येत नव्हती दरवर्षी या ठिकाणी पदाधिकारी व कार्यकर्त्यांते भाविक भक्तांची मोठ्या प्रमाणात गर्दी असते पण यावर्षी एक मंत्री दोन आमदार यात्रेला हाजरी लावुन सुध्दा गर्दी दिसुन येत नव्हती .यात्रेवर शासकीय दुखवट्याचे सावट होते काय अशी चर्चा ऐकायला मिळत होती. पालखी समोर वारु वाघ्या मुरळी वाघ्याचे डफ तुनतुनवाल्याची संख्या कमी खंडोबा देवस्थानाची पालखी व नाईकांची पालखी समोर यात्रेत म्हणावी तेवढी गर्दी दिसुन येत नव्हती शासकीय विश्रामगृहावर पालकी आली केव्हा आणी गेली केव्हा अशी आवस्था दिसुन आली पालकी समोर वारु..वाघ्या ..मुरळी..डफ ..तुनतुन वाले वारुच्या फटाक्यांचे आवाज दिसुन आले नाही,कमी प्रमाण दिसुन आले पण आज यळ अमोवस्य आसल्याने लातुर जिल्ह्यातील जनता देवस्वरीच्या दिवशी येत नाहीत पण देवश्वरीच्या दुसऱ्या दिवशापासुन गर्दीला सुरुवात होते.

**पालखी समोर भाविकापेक्षा पोलिस फौज फाटा तैनात**

पालखी समोर भाविक भक्त, वारी, मुरळी, डफ, अनेक वारुची हाजरी आसते पालखीचे दर्शन काही जनान मिळत नाही दुरुन दोन्ही हात जोडून दर्शन घेतात पण यावर्षी भक्ताला सहज पालखीचे दर्शन मिळाले भाविका पेक्षा पोलिस फौज फाटा जास्त दिसुन येत होता.

## पोलिसांनी चोराच्या आवळल्या मुसक्या



**तभा वृत्तसेवा**
**देगलूर,दि. २९ डिसेंबर**

मागील दोन दिवसापूर्वी शहरात विविध ठिकाणी झालेल्या चोरीचा गुन्हे शोध पथकाने अवघ्या ३० तासांच्या आत लक्षणीय पथकाने आत उत्तम कामगिरी केली. विधानसभा निवडणुकीचा निकाल लागताच चोरट्यांनी देगलूर शहर आणि परिसरात सपाटा लावला होता. सायंकाळी सात च्या नंतर नवीन बसस्थानकासमोरील मोहम्मद अबूबकर मोहम्मद मगदूम यांच्या कॅन्टीनच्या गल्यातून रोख ६ हजार रुपये अज्ञात चोरट्याने चोरल्याचे तक्रार त्यांनी दिली होती. देगलूर पोलीस स्टेशन च्या गुन्हे शोध पथकाने दि. २३ डिसेंबर रोजी सायंकाळी गुप्त खबरीच्या माहितीवरून पोलीस येथे राहणाऱ्या शेख इस्माईल शेख सुलतान यास ताब्यात घेऊन त्याच्याकडून चोरीला गेलेली सर्व रक्कम हस्तगत केली. दि. २२ डिसेंबर च्या रात्री ८ वाजण्याच्या सुमारास शहरातीच्या तळगल्ली भागातील प्रदीप शंकरराव येनगुडे यांच्या मॉम अँड किड्स झोन या जनरल स्टोअर्सच्या गल्यातून अज्ञात चोरट्याने ७ हजार रुपये चोराने लंपास केल्याचे चे दृश्य दुकान आणि परिसरातील सी.सी.टी.व्ही फुटेजचा आधार घेऊन गुन्हे शोध पथकाने या प्रकरणातील आरोपी अनिल गणपत कावटवार यास ताब्यात घेऊन त्याच्याकडून चोरीला गेलेले ७ हजार रुपये हस्तगत केले. त्यानंतर शहरातील तिसरी घटना दि.२३ डिसेंबरच्या सायंकाळी ५ वाजता जुन्या बसस्थानक येथे घडली.

तालुक्यातील येरगी येथील चंद्राबाई वीरशेट्टी गंटावर ही ६५ वर्षीय वृद्ध महिला देगलूर येथुन येरगीला जाण्यासाठी देगलूर-येरगी बसमध्ये बसली असता तिच्या गळ्यातील सोन्याची ६ पाने, ३० मनी तिच्या जवळ असलेली पोत चोरीला गेले.

देगलूर पोलीस स्टेशन गुन्हे शोध पथकाने अगदी साध्या वेशभूषेत फिरून जुन्या बस स्थानकाकडून उदगीर रोड कडे हळूहळू पायी चालत जाणाऱ्या दोन संशयित महिलांना पकडून पोलिसी खाक्या दाखविताच विमल प्रकाश जाधव व चांगुना सुधाकर राठोड रा.बादलगाव तांडा, ता. औराद, जिल्हा बिदर या आरोपींनी चोरीचा माल पोलिसांच्या स्वाधीन केला. अशा प्रकारे अवघ्या ३० तासाच्या आत देगलूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मारोती मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकातील पोलीस नायक कृष्णा तलवारे, पोलीस कॉन्स्टेबल सुधाकर मलदोडे, पोलीस कॉन्स्टेबल साहेबराव सगरोळीकर, पोलीस कॉन्स्टेबल वैजनाथ मोटरगे, पोलीस कॉन्स्टेबल शिवाजी आडबे, पोलीस कॉन्स्टेबल राजवंतसिंग बंगई, महिला पोलीस नायक रिहाना यांनी तीन चोरीच्या प्रकरणाचा छडा लावून लक्षणीय कामगिरी केली तर कलानगर देगलूर येथे झालेल्या दोन घरफोड्यांचा तपास सध्या पोलिसांकडून सुरु असल्याचे पोलीसाच्या सूत्रांकडून सांगण्यात येत आहे.

## नरसी बसस्थानकातून स्पेशल यात्रेच्या बसेसची सुरुवात



**तभा वृत्तसेवा**
**नायगांव,दि. २९ डिसेंबर**

बिलोली डेपो अंतर्गत नरसी बसस्थानकातून भाविक भक्तांसाठी यात्रा स्पेशल बसेसची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. दक्षिण भारतातील सर्वात मोठी यात्रा मराठवाड्यातील बहुजन समाजाचे तथा धनगर समाजाचे आराध्य दैवत नांदेड जिल्ह्यातील लोहा तालुक्यामध्ये माळेगांव येथील श्री क्षेत्र खंडोबा चे तिर्थस्थळ असून येथील तीर्थस्थळा तील मागील चालत आलेल्या परंपरेच्या अनुषंगाने प्रति वर्षा प्रमाणे या वर्षा मधील श्री क्षेत्र खंडोबा देवाची भव्य दिव्य नयनरम्य वातावरणात २९ डिसेंबर रविवार पासून पालखी सोहळ्याने यात्रेला सुरुवात झाली असून. या पालखी सोहळ्याला उपस्थिती साठी मराठवाड्यातूनच नव्हे राज्या च्या कानाकोपऱ्यातून लाखोच्या संख्येने येथे भाविक भक्तमंडळी येत असुन तेलंगणा, आंध्रप्रदेशासह बिलोली, देगलूर, नायगांव, उमरी, भोकर, धर्माबाद नरसीसह आदी परिसरातील भाविक भक्तांची प्रवासाचे हित लक्षात घेऊन. प्रवासाच्या दृष्टीने गैरसोय होऊ नये. या अनुषंगानेच बिलोली आगारातील आगार व्यवस्थापकाने नायगांव तालुक्यातील नरसीतील बस स्थानक मध्यवर्ती ठिकाण असून. येथील बसस्थानकातून भाविक भक्तांच्या प्रवासा साठी सुखकर सोयीचे असल्यामुळे दि. २८ डिसेंबर रोज बिलोली आगाराचे आगार प्रमुख एम.एस. निम्मनवाडच्या प्रमुख उपस्थिती मध्ये नरसी येथील श्री. तुळजाभवानी जिनिंग फ्रेड्रेशनचे नुतन चेअरमन तथा भाजपा मा.जिल्हा सरचिटणीस श्रावण भिलवंडे यांच्या हस्ते. दैवत श्री क्षेत्र खंडोबा देवाच्या प्रतिमेचे यावेळी पुजन करुन अभिवादन केले व येथील बसस्थानकातून माळेगांव यात्रा स्पेशल बसेसच्या कर्तव्यावर असलेल्या चालक, वाहक दोघांचाही सत्कार केला. माळेगांव स्पेशल यात्रा बसेसचे उद्घघाटन करुन यात्रेला जाणाऱ्या भाविक भक्तांना शुभेच्छा देत स्पेशल यात्रेची सुरुवात करण्यात आली.

यावेळी नरसी बस स्थानकातील नियंत्रक आर.टी गोदमवाड, इब्राहिम बेग पटेल, मोहन भिलवंडे,वाहक चंद्रशेखर कोकणे, कैलास पांचाळ, गणेश दुय्येवार, यांत्रिक विभागाचे राजू मानेमोड, शेख अजीस, गंगाधर गंगासागरे,गंगाधर भिलवंडे, शिवाजी भेदे ,आदी मान्यवर प्रतिष्ठित व्यक्ती यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते

## पद्मशाली महासभेच्या कार्यकारणी जाहीर

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव,दि. २९ डिसेंबर**



अखिल भारतीय पद्मशाली महासंघम हैद्राबाद संलग्न मराठवाडा पद्मशाली महासभा यांच्या संयुक्तिक कार्यक्रमानुसार दि. २७ रोजी शुक्रवारी हदगाव येथे पद्मशाली महासभेची एक महत्त्वपूर्ण बैठक होऊन त्यात हदगाव तालुका प्रौढ अध्यक्षपदी नामदेव कोंडलवार वायपनकर, युवा तालुका अध्यक्षपदी गजानन जिद्देवार आष्टीकर यांची तर महीला तालुका अध्यक्षपदी सौ. राजमनी गोविंद यम्मेवार यांची बिनविरोध निवड करण्यात आली. निवडीचे तालुक्यातील पद्मशाली समाज बांधवांकडून मोठे स्वागत होत आहे.

माजी अध्यक्ष बालाजी चिलवरी यांचे निवासस्थानी नांदेड पद्मशाली महासभेचे नांदेड युवक जिल्हाध्यक्ष तथा निवडणूक अधिकारी संग्राम निलपत्रेवार, यांचे अध्यक्षतेखाली पद्मशाली महासभेची महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली. यावेळी पद्मशाली महासभेचे राज्य उपाध्यक्ष तथा सहाय्यक निवडणूक अधिकारी विजय वडेपल्ली, जिल्हा युवक कार्याध्यक्ष व्यंकटेश अमृतवार, नांदेड सिडकोचे चौधरी भुमाजी मामिडवार, पद्मशाली महासभेचे नांदेड दक्षिण तालुका उपाध्यक्ष गणेश गोणे, हदगाव माजी नगरसेवक बाबुअण्णा पिचकेवार आदींची प्रमुख उपस्थिती होती. विविध चर्चेअंती पद्मशाली महासभेची नवीन कार्यकारिणीची निवड करण्यात आली. यात हदगाव तालुका प्रौढ संघटनेच्या अध्यक्षपदी नामदेव काशिनाथ कोंडलवार वायपनकर, तालुका महिला संघटनेच्या अध्यक्षपदी सौ. राजमनी गोविंदराव येमेवार यांची तर पद्मशाली युवक संघटनेच्या अध्यक्षपदी पत्रकार गजानन विजय जिद्देवार आष्टीकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली. निवड झालेल्या नवनिर्वाचित अध्यक्षांचे शाल पुष्पहारांनी स्वागत करण्यात आले. प्रसंगी ज्ञानेश्वर पिचकेवार, नागेश मेकेवार, पांडूरंग येमेवार यांचेसह अनेकांची उपस्थिती होती.

## संक्षिप्त वृत्त

### पंच दिवसीय नाम संकीर्तनाचे आयोजन



**बाऱ्हाळी**-गुरुवर्य यशवंत तथा मिठूदेव महाराज बा-हाळीकर यांच्या प्रथम पुण्यतिथींच्या निमित्ताने पंच दिवसीय नाम संकीर्तन महोत्सवाचे आयोजन बा-हाळी येथे करण्यात आले आहे .या सोहळ्यात महाराष्ट्रातील प्रख्यात कीर्तनकार ,प्रवचनकार हजेरी लावणार आहेत हा सोहळा दि.३१ डिसेंबर ते ४ जानेवारी दरम्यान नगरेश्वर मंदिर येथे आयोजित केला आहे. या कार्यक्रमामध्ये परिसरातील व महाराष्ट्र राज्यातील गुणी कलावंत सहभागी होऊन भक्ती ज्ञान रसाचा आस्वाद देणार आहेत तरी परिसरातील भक्तगणांनी प्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन मकरंद व अनिरुद्ध यशवंत महाराज जोशी ,समस्त ग्रामस्थ व भक्त मंडळी भजनी मंडळ बा-हाळी यांनी केले आहे.

### माजी विक्रीकर नारायण जोगदंड यांचे निधन



**नवीन नांदेड**-माजी विक्रीकर अधिकारी उपा.नारायण विठ्ठलराव जोगदंड यांचे वयाच्या ९१व्या वर्षी वृध्दपकाळाने त्यांच्या हाडको येथील निवासस्थानी दिनांक २९ डिंसेबर रोजी निधन झाले. त्यांची अंतविधी दिनांक २९ रोजी रविवारी द. ५ वा. सिडको येथील वैकुंठधाम स्मशानभूमी येथे त्यांच्या पार्थिव देहावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात चार मुले,सुना, दोन मुली, जावई नातवंडे आसा मोठा परिवार आहे. सामजिक कार्यकर्ते नंदु, अरुण, प्रदीप, रवि जोगदंड यांचे ते वडील होते.

### वैजनाथ खंडगुळे यांचे निधन



**आदमपूर**-बिलोली तालुक्यातील ग्राम आदमपूर येथील जेष्ठ नागरिक वैजनाथ भिमराव खंडगुळे(७०) यांचे अल्पशा आजाराने दि.२८ डिसेंबर रोजी शनिवारी रात्री १० वाजता दुखःद निधन झाले.त्यांच्या पार्थिवावर दि.२९ डिसेंबर रोजी रविवारी दुपारी १ वाजता आदमपुरात अंत्यसंस्कार करण्यात आले.आदमपूर परिसरात एक प्रामाणिक,दत्त संप्रदायातील अग्रेसर व्यक्तिमत्त्व म्हणून ते लोकप्रिय होते.त्यांच्या पश्चात दोन मुले, सूना,दोन मुली, जावई,नातवंड असा मोठा परिवार आहे.

## जानापुरी शाळेत सीसीटीव्ही यंत्रणा: विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी आदर्श उपक्रम




**तभा वृत्तसेवा**
**सोनखेड,दि. २९ डिसेंबर**

विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा विचार करत ग्रामपंचायत जानापुरीच्या वतीने आणि उपसरपंच संतोष सदाशिवराव कदम यांच्या संकल्पनेतून जानापुरी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले. हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल असून, शाळेच्या व्यवस्थापन आणि ग्रामस्थांकडून याचे विशेष स्वागत करण्यात आले आहे.

या उपक्रमाचा शुभारंभ उपसरपंच संतोष कदम यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी ग्रामपंचायत सरपंच दादाराव गच्चे, ग्रामपंचायत सदस्य रामा लोखंडे, ब्रह्मानंद पुरी, भिवाजी राठोड, ग्रामपंचायत अधिकारी जगन्नाथ मुंडकर तसेच शाळेतील शिक्षक आणि अनेक ग्रामस्थ उपस्थित होते.उपसरपंच संतोष कदम यांनी सांगितले की, शाळेत सीसीटीव्ही यंत्रणा बसवण्यामागचा उद्देश केवळ विद्यार्थ्यांची सुरक्षा सुनिश्चित करणे हा नसून, त्यांचा शैक्षणिक प्रवास अधिक दर्जेदार बनवणे हा आहे. या यंत्रणेच्या साहाय्याने शिक्षकांना विद्यार्थ्यांवर अधिक चांगल्या प्रकारे लक्ष ठेवता येईल आणि शाळेतील शिस्तबद्धता टिकवली जाईल. शाळेत सीसीटीव्ही बसवल्यामुळे पालकवर्गाने समाधान व्यक्त केले आहे. आमच्या मुलांची सुरक्षा हा प्रत्येक पालकासाठी महत्त्वाचा विषय आहे. या यंत्रणेमुळे मुलांचे संरक्षण आणि त्यांच्या वागणुकीवर लक्ष ठेवणे अधिक सोपे होईल, असे एका पालकाने नमूद केले.सीसीटीव्हीमुळे विद्यार्थ्यांमध्येही उत्साहाचे वातावरण आहे. शाळेतील सुरक्षित वातावरणामुळे विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासात वाढ होईल,असे शिक्षकांनी सांगितले.


ग्रामपंचायतीच्या या उपक्रमामुळे शाळेतील शिक्षण आणि सुरक्षिततेमध्ये सुधारणा होईल, असे ग्रामस्थांनी म्हटले. त्यांनी ग्रामपंचायतीकडून भविष्यातही शाळेसाठी अशाच उपक्रमांची अपेक्षा व्यक्त केली. या उपक्रमामुळे जानापुरी ग्रामपंचायतीने अन्य गावांसाठी एक आदर्श निर्माण केला आहे. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी असे उपक्रम राबवले जाणे ही काळाची गरज असल्याचे ग्रामस्थांनी अधोरेखित केले.

## बळीरामपूर येथे घराला आग लागून लाखोंचे साहित्य जळून खाक

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड,दि. २९ डिसेंबर**

बळीरामपूर येथील रहिवासी अंबाजी वाघमारे यांच्या घराला अचानक आग लागल्याने पन्नास हजार रोक रक्कमेसह पाच लाख रुपयाचे संसार उपयोगी साहित्य जळून खाक झाल्याची घटना दिनांक २८ डिसेंबर रोजी घडली.

सिडको एमआयडीसी लगत असलेल्या बळीरामपूर वसाहतीतील अंबाजी वाघमारे यांच्या राहत्या घरी गॅसचा भडका झाल्याने ही आग लागली. या आगीत संसार उपयोगी वस्तुसह गहू, ज्वारी, अन्नधान्यसह इतर वस्तूही जळून खाक झाल्या आहेत त्यातच घरातील रोख रक्कम ५० हजार रुपये जळून गेले असल्याची माहिती मिळाली. सदरील घटना स्वयंपाकाचा गॅस सिलेंडर लिकेज झाल्याने ही आग एकदम रुद्ररूप धारण केल्याचे समजते. यावेळी एमआयडीसी येथील अग्निशमन दल व ग्रामस्थ यांच्या मदतीने आगिस आटोक्यात आणले सदरील घटना कळताच नांदेड ग्रामीण ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोळकर यांनी भेट देऊन परिस्तथिती जाणुन घेतली तसेच दक्षिण मतदार संघाचे नवनिर्वाचित आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांनी घर जळालेल्या कुटुंबीयांना ५१ हजार रुपये मदत




जाहिर करून त्यांना तात्काळ खानपानासाठी लागणारे अन्नधान्य देण्यात आले. याप्रकरणी अंबाजी वाघमारे यांनी दिलेल्या माहितीनुसार ग्रामीण पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली पोलीस अंमलदार संभाजी व्यवहारे अधिक तपास करीत आहेत.

## १८ वर्षीय मुलीची छेड काढणाऱ्या आरोपीस पोलीसांनी केली अटक

**तभा वृत्तसेवा**
**अर्धापूर,दि. २९ डिसेंबर**

तालुक्यातील एका गावातील बावीस वर्षीय तरुणीचा लपुन पाठलाग करत वाईट उद्देशाने हात धरून ओढले व जुन्या फोटो शेअर करण्याची धमकी दिली. या जबाबावरून अर्धापूर पोलिस ठाण्यात एका मुलावर गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर घटना दि.२७ डिसेंबर शुक्रवारी रोजी सायंकाळी घडली आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी युवती आणि आरोपी मुलगा अर्धापूर येथे शिक्षणासाठी असताना कार्यक्रमाच्या वेळी फोटो काढल्या होत्या. नंतर फिर्यादी मुलगी पुढील शिक्षणासाठी पुणे येथे गेली होती. दि.२५ बुधवार रोजी ती मूळ गावी परत आली. व दि.२७ शुक्रवार रोजी आई सोबत शेतातील निंदण करून परत घराकडे येत असताना कामठा बु ता.अर्धापूर येथील अविनाश राजु गाढवे हा फिर्यादी मुलीच्या पाठीमागून हळूहळू येऊन, वाईट उद्देशाने हात धरून जवळ ओढले त्यामुळे फिर्यादी मुलीच्या मनात लाज निर्माण झाली व मुलीचे फोटो व्हायरल करतो म्हणून धमकी दिली. या जबाबावरून पोलीस निरीक्षक चंद्रशेखर कदम यांच्या आदेशावरून पोउनी एस.बी.भोसले यांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सापोनि व्ही.वाय.क-हाळे हे करीत आहेत.

# सिमेंट वाहतुक करणारा ट्रक पैनगंगेच्या पात्रात कोसळला

## मराठवाडा सिमेवर माहूर हद्दीत धनोडा गावाजवळ अपघात

**तभा वृत्तसेवा**
**माहूर,दि. २९ डिसेंबर**

पैनगंगा नदीला पूर येऊन गत दोन तीन वर्षापूर्वी धनोडा पुलावरील दोन्ही बाजूंचे लोखंडी संरक्षक कठडे पाण्यात वाहून गेले आणि तेंव्हा पासून आजपर्यंत सार्वजनिक बांधकाम विभाग माहूर व महागाव यांनी सदरील पुलावर संरक्षक कठडे उभारण्याची तसदी न घेतल्याने या पुलास नागरीक उपहासाने 'टकला' पुल म्हणून संबोधतात. वाहनांचे अनेक वेळा छोटे मोठे अपघात याठिकाणी झाले.परंतू,आज शनिवार दिनांक २८ रोजी सायंकाळी ०६ वा.च्या सुमारास सदरील विदर्भ- मराठवाड्याला जोडणाऱ्या पैनगंगा नदीच्या पुलावरून एक ट्रक धनोडा आणि माहूर च्या दरम्यान पैनगंगेच्या पात्रात आज शनिवार दि. २८ डिसेबरच्या सायंकाळी पावणेसहा वाजताच्या सुमारास एक मालवाहू ट्रक नदीपात्रात कोसळला. काळजाचा ठोका चुकविणारा हा अपघात झाला. केटीसी कंपनीचा ट्रक (क्र.एमएच ३४ एबी ४०२३) माहूर मार्गे सिमेंट घेऊन यवतमाळ कडे निघाला होता.पैनगंगा नदीवरील अरुंद पुलावर येताच ट्रकचे समोरील चाके निखळल्यामुळे अनियंत्रित झालेला ट्रक माहूरच्या हद्दीत पुलावरून थेट नदीपात्रात कोसळल्याची माहिती प्रत्यक्षदर्शींनी दिली आहे. अपघातानंतर झालेल्या मोठ्या आवाजामुळे स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली.



ट्रकमध्ये चालकाव्यतीरिक्त अन्य कोणी नव्हते. या अपघातात चालक गंभीररित्या जखमी झाला. तो अपघातग्रस्त ट्रकच्या केबीनमध्ये दबला होता. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे महाराष्ट्र प्रदेश सचिव प्रविण जयस्वाल आणि माहुर येथील सामाजिक कार्यकर्ते विनोद भारती यांनी लगेच बाजुच्या बंधाऱ्यावरील जेसीबी आणून मदतकार्य सुरू केले. अथक प्रयत्नानंतर ट्रक चालकास केबिन मधून बाहेर काढण्यात यश आले. चालकाची प्रकृती चिंताजनक असून त्याला उपचारासाठी माहूर येथील रुग्णालयात हलविण्यात आले आहे. विदर्भ-मराठवाड्याला जोडणारा हा ऐतिहासिक पुल सातत्याने दुर्लक्षित आहे. पुलाला मागील दोन तीन वर्षापासून संरक्षक कठडे नाहीत.यासंबंधात विविध वृत्तपत्रांमधून अनेक वेळा वृत्त प्रकाशित करूनही पुलाची डागडूजी केली जात नाही. व अटीतटीच्या अपघात समयी वाहनांना संरक्षण देणारे संरक्षक कठडे या पैनगंगा नदी पुलावर सार्वजनिक बांधकाम विभागाने उभारले नसल्याने या पुलावरून ये जा करताना पादचाऱ्यांसह वाहनधारकांचा जीव सतत टांगणीला लागलेला असतो. राज्यातील साडेतीन शक्तिपीठांपैकी एक मूळ पीठ असलेल्या माहूर गडावर दर्शनासाठी दैनंदिन हजारो भाविक आणि मराठवाडा विदर्भ व तेलंगणा या भागाकडे होणारी वाहतूक याच पुलावरून दिवसरात्र सुरू असते.अशा भर रहदारीच्या पुलावर आतातरी सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने लोखंडी संरक्षक कठडे उभारुण संभावित भिषण मोठे व वाहनचालक व प्रवासाचे बहुमुल्य जीव वाचवावे अशी मागणी या अपघात निमित्ताने नागरिकांसह वाहनचालकांमधून करण्यात येत आहे.

चला छत्रपती संभाजीनगर ... लोकनेत्याच्या नागरी सत्काराला !

ऐतिहासिक सत्कार सोहळ्याचे साक्षीदार होऊया !

लोकनेते आमदार मा.श्री.

## अब्दुल सत्तार साहेबांचा

# भव्य नागरी सत्कार व



पल्लवी सिल्लोड - ९४०३४०८९२२

# अभिष्टचिंतन सोहळा

**दिनांक : 01 जानेवारी 2025,बुधवार रोजी वेळ : सायं.4 वाजता**

**स्थळ : मराठवाडा सांस्कृतिक क्रिडा मंडळ मैदान,छत्रपती संभाजीनगर**

तसेच सालाबादाप्रमाणे याहिवर्षी मा.आ.अब्दुल सत्तार साहेब यांच्या वाढदिवसानिमीत्त

## मोफत भव्य सर्वरोग निदान,उपचार कृत्रिम भिंगारोपण शस्त्रक्रिया व महारक्तदान शिबीर

नेत्र शस्त्रक्रिया दिनांक

| | | |
|---|---|---|
| 15 डिसेंबर 2024<br>रविवार रोजी | 18 डिसेंबर 2024<br>बुधवार रोजी | 29 डिसेंबर 2024<br>रविवार रोजी |

काळे चष्मे वाटप : 02 जानेवारी 2025,गुरूवार रोजी

गरजु रुग्णांनी या मोफत तपासणी,निदान व उपचार शिबीराचा लाभ घ्यावा,हि विनंती !

**दिनांक : 02 जानेवारी ते 10 जानेवारी 2025**

**स्थळ : नॅशनल हॉस्पीटल,महाराणा प्रतापसिंह चौक,सिल्लोड जि.छत्रपती संभाजीनगर**

विनित व आयोजक : लोकनेते आमदार अब्दुल सत्तार साहेब मित्र मंडळ,छत्रपती संभाजीनगर शहर व जिल्हा